मंगळवार, ३ ऑक्टोबर २०२३
⊙ किमत ५ रुपये | छत्रपती संभाजीनगर (महाराष्ट्र)
⊙ मराठी ⊙ दैनिक
⊙ वर्ष - ०३ ⊙ अंक - ६१
⊙ आरएनआय : एमएएचएमएआर/२०२१/८२५६६

आधुनिक केसरी
विश्वव्यापी मराठी दैनिक

● MARATHI ● DAINIK ● CHHATRAPATI SAMBHAJINAGAR (MAHARASHTRA) TUESDAY 3 OCT. 2023 | adhunikkesari.com | Adhunik Kesari | ● YEAR-03 ● ISSUE-61 ● RNI : MAHMAR/2021/82566 ● PAGE-12 ● PRICE-5

# नांदेड शासकीय रुग्णालयात मृत्यूचे तांडव

आधुनिक केसरी न्यूज

**नांदेड : काही दिवसांपूर्वी कल्याणच्या रुक्मिणीबाई शासकीय रुग्णालयात एका गर्भवती महिलेला दाखल न केल्याने रुग्णालयाच्या गेटवर तिची प्रसूती झाल्याची माहिती समोर आली होती. त्याआधी काही महिन्यांपूर्वी कळव्याच्या छत्रपती शिवाजी महाराज रुग्णालयात एकाच रात्री तब्बल 17 रुग्णांचा मृत्यू झाल्याची माहिती समोर आली होती. विशेष म्हणजे महाविकास आघाडी सरकारच्या काळात भंडारा येथील जिल्हा शासकीय रुग्णालयात आगीमुळे 10 नवजात बालकांचा होरपळून मृत्यू झाल्याची घटना घडली होती. या सगळ्या घटनांमधून प्रशासनाने काहीच धडा घेतलेला नसल्याचे दिसत आहे. कारण शासकीय रुग्णालयांमध्ये होणाऱ्या मृत्यूच्या घटना वाढताना दिसत आहेत. नांदेडच्या शासकीय रुग्णालयातीलही धक्कादायक प्रकार समोर आला. या रुग्णालयात 24 तासांत तब्बल 24 रुग्णांचा मृत्यू झाल्याची माहिती समोर आली आहे. त्यामुळे एकच खळबळ उडाली आहे. मराठी वृत्तवाहिनी टीव्ही 9ने याबाबतचे वृत्त दिले आहे.**




टीव्ही 9ने दिलेल्या माहितीनुसार, हाफकीनने औषधी खरेदी बंद केल्यामुळे राज्यभरातील शासकीय रुग्णालयात औषधांचा प्रचंड तुटवडा जाणवत आहे. त्यामुळे अत्यवस्थ रुग्णांना वेळेत औषधे पुरवठा होत नसल्याने जीव गमवावा लागत आहे. असाच धक्कादायक प्रकार नांदेडमधल्या शासकीय रुग्णालयात पुढे आला आहे.नांदेडच्या शासकीय रुग्णालयात गेल्या 24 तासात 24 रुग्णांचा रुग्णालयात मृत्यू झाला आहे. यात गंभीर बाब म्हणजे मृतकांमध्ये 12 नवजात बालकांचा समावेश आहे. या घटनेमुळे आरोग्य यंत्रणेची लक्तरे वेशीवर टांगली गेली आहेत. मृतांच्या नातेवाईकांना या प्रकरणावरुन प्रशासनावर संताप व्यक्त केल्या. तर दुसरीकडे या प्रकरणी शासकीय रुग्णालयाचे अधिष्ठाता एस आर वाकोडे यांनी मृतांध्ये बाहेरच्या रुग्णाचा समावेश होता, असा दावा केला आहे. संबंधित घटना अतिशय गंभीर आहे. त्यामुळे या घटनेनंतर आरोग्य प्रशासन काही ठोस पाऊल उचलते का? हे पाहणे महत्त्वाचे ठरणार आहे. या प्रकरणी आरोग्य विभागाकडून योग्य कारवाई होणे अपेक्षित आहे. सरकारने या घटनेची गंभीर दखल घेतली पाहिजे. एकाच दिवशी रुग्णालयातील 24 रुग्ण दगावणे हे किती धक्कादायक आहे. रुग्णांना खरेच वेळेवर औषध मिळाले नाही का? याची चौकशी होणे अपेक्षित असल्याचे मत व्यक्त केले जात आहे.

## महत्त्वाची बातमी

### फेरीवाल्याला मनसे कार्यकर्त्यांकडून चोप

आधुनिक केसरी न्यूज

**मुंबई :** कल्याणमध्ये एका विद्यार्थ्याला मराठी असल्याच्या मुद्द्यावरुन परप्रांतीय फेरीवाल्याने शिवीगाळ केल्याने मनसेकडून फेरीवाल्याला मारहाण करण्यात आली. वाशिंद येथे राहणारा एक विद्यार्थी कल्याणमध्ये काही कामानिमित्त आला होता. त्यावेळी त्याने कल्याण रेल्वे स्थानकाजवळ असलेल्या स्कायवॉकवर बसलेल्या फेरीवाल्याकडून एक वस्तू विकत घेतली होती. ती वस्तू खराब असल्याने तो विद्यार्थी पुन्हा कल्याणमध्ये आला. विद्यार्थ्याने ती वस्तू बदलून देण्यासाठी फेरीवाल्याकडे विनंती केली. मात्र फेरीवाल्यांनी ती वस्तू बदलून देण्यास नकार दिला. फेरीवाल्याने “तुम मराठी लोक ऐसे ही होते हो”, असे बोलून मराठी भाषेचा आणि मराठी माणसाचा अपमान केला. या विद्यार्थ्याने कल्याणमधील मनसे कार्यकर्त्यांना घडलेला प्रकार सांगितला. त्यानंतर कल्याणमधील मनसे कार्यकर्त्यांनी त्या फेरीवाल्याला जोरदार चोप दिला. फेरीवाल्याला मनसे कार्यकर्त्यांकडून करण्यात आलेल्या मारहाणीचा व्हिडीओ सोशल मीडियावर व्हायरल झाला. त्यानंतर मनसे कार्यकर्त्यांनी योग्य कारवाई केली. मी त्यांचे धन्यवाद मानतो”, अशी प्रतिक्रिया विद्यार्थ्याने दिली.

# खामगावात प्रकटले गजानन महाराज?

## दर्शनासाठी भाविकांची तुफान गर्दी

आधुनिक केसरी न्यूज

**खामगाव :** बुलढाणा जिल्ह्यातील खामगाव तालुक्यात एक अजब प्रकार घडला. सुटाळ पुरा गावात राहणाऱ्या अशोक सातव यांच्या घरात रविवारी रात्रीच्या सुमारास अचानक एक व्यक्ती आली. या व्यक्तीची वेशभूषा पूर्णतः गजानन महाराज यांच्यासारखीच होती. त्यामुळे साक्षात गजानन महाराजच प्रकटले, अशी बातमी संपूर्ण खामगाव शहरात वाऱ्यासारखी पसरली. गजानन महाराजांसारख्या दिसणाऱ्या या व्यक्तीला पाहण्यासाठी नागरिकांनी तुफान गर्दी केली. सातव यांच्या घराभोवती भक्तांनी गजानन महाराजांच्या दर्शनासाठी गर्दी केली. बघता-बघता या परिसराला यात्रेचा स्वरूप प्राप्त झालं. शेवटी पोलिसांना ही पाचारण करावे लागलं. मिळालेल्या माहितीनुसार, खामगाव तालुक्यातील सुटाळपुरा परिसरातील



अशोक सातव यांचं घर आहे. रविवारी रात्री ८ वाजेच्या सुमारास त्यांच्या घरासमोर गजानन महाराजांची वेशभूषा करून अचानक एक व्यक्ती आली. मला तुमच्या घरी जेवण करायचं, असं या व्यक्तीने सातव कुटुंबियांना म्हटलं. त्यानुसार, सातव कुटुंबियांनी या व्यक्तीच्या जेवणाची सोय केली. दरम्यान, या व्यक्तीला शेजारच्यांनी जेवताना बघितलं. सातव यांच्या घरात गजानन महाराज प्रगटले, असं त्यांना वाटलं. बघता-बघता ही बातमी संपूर्ण खामगाव शहरात वाऱ्यासारखी पसरली परिसरातील नागरिकांनी वाटेल ते वाहन पकडत सुटाळपुरा गावाकडे धाव घेतली. गजानन महाराज अवतरले असं म्हणत सातव यांच्या घरासमोर भाविकांनी तुफान गर्दी केली. संत गजानन महाराजांचा जयघोष करत शेकडो लोक या ठिकाणी दर्शनासाठी गर्दी करत होती. बघता-बघता या गर्दीला यात्रेचं स्वरुप आलं. दरम्यान, ही घटना कळताच खामगाव पोलिसांनी तातडीने घटनास्थळी धाव घेतली. पोलिसांनी भाविकांची गर्दी हटवली. मात्र ही व्यक्ती कोण आहे..? कुठून आली..? याबाबत अद्यापही कुणाला माहिती नाही. या संपूर्ण प्रकाराचा व्हिडीओ सध्या सोशल मीडियावर तुफान व्हायरल झाला आहे.

# लिलावात सहभागी व्यापाऱ्यांना व्यापाऱ्याची शिवीगाळ व्हायरल

## नाशिक - छत्रपती संभाजीनगर महामार्गावर रास्ता रोको

आधुनिक केसरी न्यूज

**निफाड :** नाशिक जिल्ह्यातील एक कांदा व्यापाऱ्याने एक व्हाट्सअप ग्रुपवर चर्चा करताना लिलावात सहभागी व्यापारी व संचालक मंडळाला अर्वाच्य भाषेत शिवीगाळ केली. मात्र ही ऑडिओ क्लिप व्हायरल झाली. त्यामुळे लासलगाव उपबाजार असलेल्या विंचुर येथील व्यापाऱ्यांनी संतप्त होत काही काळ लिलाव बंद ठेऊन नाशिक छत्रपती संभाजीनगर महामार्गावर रास्ता रोको केला. याबाबत जिल्हा पोलिस अधीक्षक शहाजी उमाप यांना निवेदन देण्यात आले असून संबधित व्यापारी व व्हाट्सअप ग्रुप अडमिनवर कारवाई करण्याची मागणी केली आहे. शेतकऱ्यांची गैरसोय टाळण्यासाठी विंचुर उपबाजार आवारातील व्यापाऱ्यांनी दि.२८ सप्टेंबर पासून लिलावात सहभाग घेतला आहे. तेथील धान्य लिलावही सुरळीत होते. या लिलावात पहिल्या दिवशी ५००, दुसऱ्या दिवशी १५०० व तिसऱ्या दिवशी १९०० मग कांदा खरेदी केली. आज दि.२ ऑक्टो रोजी सकाळच्या सत्रात १३०० नग लिलाव झाला व दुपारी २५०० नग आवक आहे. मात्र लासलगाव तसेच इतर बाजार समित्या बंद आहेत. मात्र असे असताना नाशिक जिल्ह्यातील एक कांदा व्यापारी जितेंद्र कापडणेकर यांनी व्हाट्सअप ग्रुपवर चर्चा करताना लिलावात सहभागी व्यापारी तसेच संचालक मंडळ यांना जातीवाचक शिवीगाळ, व्यापाऱ्यांना भर रस्त्यात मारू, त्यांना पेटवू, त्यांचे धंदे बंद करू, त्यांना रॅकमध्ये जागा कशा मिळतात तेच बघू असे अश्लील व आक्षेपार्ह्य संभाषण केले. मात्र ते संभाषण व्हायरल झाल्याने विंचुर येथील व्यापारी संतप्त झाले. गांधी जयंती असल्याने संचालक पंढरीनाथ थोरे यांनी गांधींच्या शांततेच्या मार्गाने जाऊन नाशिक- छत्रपती संभाजीनगर रास्ता रोको करत निषेध नोंदविला. त्या व्यापाऱ्यावर गुन्हा दाखल करण्याची मागणी करण्यात आली. लासलगाव पोलीस स्टेशनचे स.पो. नि राहुल वाघ यांनी फौज फाट्यासह विंचूर बाजार समितीस भेट देऊन परिस्थिती योग्य प्रकारे हाताळली व लिलाव सुरु करण्याचे आवाहन केले. व्यापाऱ्यांनी त्यांच्या आवाहनास प्रतिसाद देत पोलीस बंदोबस्तात लिलाव सुरु करण्यात आला.

# काँग्रेसच्या होमपिचवर विरोधकांचे डावपेच..!

## भोकर मतदार संघात राजकीय मंथन : तटबंदी किल्ल्यावर चढाईचा प्रयत्न

आधुनिक केसरी न्यूज


भोकर : विधानसभा मतदारसंघात प्रारंभी पासून काँग्रेस पक्षाचा वरचष्मा राहिला आहे. दरम्यान राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष आणि अपक्षाने किल्ला सर केला होता. काँग्रेसचे माजी मुख्यमंत्री अशोक चव्हाण यांनी पुन्हा मतदार संघाला गतवैभव प्राप्त करून दिल्याने विरोधकाचे प्रयत्न फोल ठरले आहेत. आगामी काळात होऊ घातलेल्या निवडणूकीच्या हंगामात काँग्रेसच्या होमपिचवर विरोधकांनी डोळा ठेवून किल्ला सर करण्यासाठी आतापासूनच डावपेच आखणी सुरू केल्याचे दिसून येत आहे. मतदार कुणाच्या बाजूने कौल देतील हे येणारा काळच ठरवेल.याकडे सर्वाचे लक्ष लागून आहे. भोकर विधानसभा मतदारसंघ संघाच्या पहिल्या विधानसभा निवडणुकीत काँग्रेस पक्षाचे (कै.)दिगाबंरराव बिंदू यांनी विजयाची मुहूर्तमेढ रोवली आणि राजकीय क्षेत्रात मोलाच कार्य केले आहे. (कै.) माजी केंद्रीय गृहमंत्री शंकरराव चव्हाण याची राजकीय क्षेत्रात याच मतदारसंघातून घौडदौड सूरू झाली आहे. या कारणांमुळे हा मतदारसंघाची राजकीय क्षेत्रात वेगळी ओळख निर्माण झाली आहे.दरम्यानच्या काळात (कै .) आमदार बाबासाहेब देशमुख गोरठेकर,(कै.) आमदार बापूसाहेब देशमुख गोरठेकरानी मतदार संघात आपली पक्कड मजबूत केली होती.अशातच माजी मंत्री डॉ. माधवराव किन्हाळकरांना राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाने ऊमेदवारी देवून नशीब आजमावल होत त्यात त्यांना यशहि मिळाल असल तरी ते फारकाळ तग धरू शकल नाही. गोरठकरांनी पुन्हा सत्ता काबीज केली आणि विधानसभा मतदारसंघाची फेररचना होताच राजकीय उलथापालथ झाली.



चव्हाणासाठी सोयीचा मतदार संघ : अशोक चव्हाणांनी ईतर मतदार संघा पैकी त्यांच्यासाठी सूरक्षीत असलेल्या मतदार सघाची चाचपणी सुरू केली असता त्यांनी भोकर मतदार संघ सोयीचा असल्याने ते दत्त म्हणून ईकडे हजर झाले आणि मातब्बर राजकीय नेत्याची गळचेपी झाली. मुदखेड तालुक्यात चव्हाण कुटुंबीयांनी केलेली सिंचनाची सोय आणि अर्धापूर तालुका नांदेडच्या अगदी लगत असल्याने चव्हाणांचा दाडंगा संपर्क तसेच भोकर तालुक्यात (कै.)शंकरराव चव्हाणांनाना माननाणारा मोठा वर्ग असल्याने अशोक चव्हाणांसाठी राजकीय सोयीचा ठरला नव्हेतर राज्यातुन सर्वाधिक मतदान घेवून ते अव्वलस्थानी होते. शिवाय त्यांना थेट मुख्यमंत्री होण्याचा बहुमान मिळाला आहे हे विशेष होय. नेतृत्व स्वीकारताच मतदार संघाला झुकतमाप देवून जिव्हाळ्याचे संबध निर्माण केले आहेत.

मागील तीन वर्षांपासून स्थानिक पातळीवर असलेल्या राज्यातील जिल्हा परिषद, पंचायत समिती, महानगर पालिका, नगरपालिका निवडणुका झाल्या नाहीत .प्रशासकाच्या भरवशावर कारभार सुरू असल्याने विकासकामे मंदावली आहेत .लोकसभा, विधानसभा निवडणुका तोंडावर आल्याने आगामी काळात निवडणुकीचा "हंगाम" सुरू होणार असल्याने भोकर मतदार संघात काँग्रेसच्या होमपीचलर पून्हा एकदा विरोधकांनी डावपेच आखणी सुरू केली आहे .यात प्रामुख्याने भाजपा, राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष ( अजीत पवार गट ),बीआरएस पक्ष, मनसे, वंचीत बहुजन आघाडी,बसपा,प्रहार संघटणा,एमआयएम पक्ष यांचा समावेश आहे . विरोधकाच्या हालचालीमुळे काँग्रेस पक्ष सावध भुमीका घेत स्थानिक पातळीवरील गटतट, बंडोबांना थंड करून नैया पार करताना तारेवरची कसरत करावी लागणार आहे त्यामुळे डोकेदुखी वाढणार असल्याचे समजते .

विरोध ठरले अपयशी : भोकर मतदार संघातील काँग्रेस पक्षाची चमकदार कामगिरीमुळे विरोधकाचे पोटशूळ ऊठले आणि काँग्रेसचा किल्लासर करण्यासाठी चढाई सुरु केली. मागच्या लोकसभेच्या वेळी काँग्रेसच्या थोड्याफार चुकीचा फायदा भाजपला झाला. तेव्हा काँग्रेस पक्षाने सिंहावलोकन करुन विस्कटलेली घडी सूरळीत केली व पुन्हा काँग्रेसला "अच्छे दिन" आले. विरोधकांनी "अपशातच यश दडलेलं असतं"असे म्हणत आपले प्रयत्न सुरू ठेवले असून आज ही त्यांनी माघार न घेता खटाटोप सुरू ठेवला आहे. पण प्रत्येक निवडणुकीत अपयश पदरी आले हे मात्र खरे आहे.




विश्वास देशपांडे
संपर्क क्र. 9403749932


# श्री गणेशाला दुर्वा प्रिय का ?

आधुनिक केसरी

त्यावेळी गणपती बाल रुपात प्रकट झाला. त्याने देवांना मी अनालासुराचा निःपात करतो. तुम्ही निश्चिंत राहा असे आश्वासन दिले.

बालगणेशाने अनलासुराला युद्धाचे आव्हान दिले. दोघांमध्ये भयंकर युद्ध झाले. अनलासुर हा अक्राळविक्राळ, डोळ्यातून अग्निज्वाला बाहेर पडणारा आणि प्रचंड मोठा आवाज असणारा होता. त्याच्या आवाजाने धरणी सुद्धा कंपित होत असे. त्याने मोठ्या आवेशाने बालगणेशालाच गिळून टाकण्याचा प्रयत्न केला. पण गणेशाने आपल्या दैवी सामर्थ्याने त्यालाच गिळंकृत केले. अनलासुर ठार झाला. सर्वत्र आनंदीआनंद झाला. देवांनी गणेशाचा जयजयकार केला. पण अनलासुराला गिळल्याने गणेशाच्या अंगाचा प्रचंड दाह होऊ लागला. तो शांत करण्यासाठी पार्वतीने त्याला चंदनाचा लेप लावला. शंकराने त्याच्या मस्तकावर चंद्र ठेवला. म्हणून श्री गणेशाला भालचंद्र हे नाव मिळाले. तसेच त्याच्या अंगाची आग शांत व्हावी म्हणून आपल्या गळ्यातील नाग त्याच्या कमरेला बांधला. एवढे करूनही आग कमी होईना. तेव्हा भगवान विष्णूंनी आपल्याकडील कमळ त्याला दिले. म्हणून त्याला पद्मपाणी हे नाव मिळाले. वरुणाने पाण्याचा अभिषेक केला. या नंतर काही ऋषिगण तेथे आले. त्यांनी प्रत्येकी एकवीस दुर्वांची जुडी श्री गणेशाच्या मस्तकावर ठेवली. या उपायामुळे त्याला तत्काळ बरे वाटू लागले, त्याच्या अंगाचा दाह कमी झाला. म्हणून श्री गणेशाने सांगितले की जो कुणी मला श्रद्धेने दुर्वा अर्पण करील, त्याला हजारो यज्ञांचे आणि तपश्चर्येचे पुण्य प्राप्त होईल. तीर्थयात्रा आणि दानधर्म केल्याचे पुण्य मिळेल. म्हणून आपण श्री गणेशाला दुर्वा वाहतो. दुर्वांमध्ये शीतलता आहे. उष्णतेच्या विकारावर दुर्वांचा रस उपयोगी आहे. दुर्वांचे महत्व सांगणारी दुसरी एक कथा आहे. पूर्वी कौंडींण्य ऋषी आपल्या आश्रमात आपली पत्नी आश्रया हिच्यासोबत राहत होते. आपल्या पत्नीला श्री गणेशाची महती सांगताना त्यांनी तिला दुर्वांचे महत्व सांगितले. पण ते ऐकून तिला आश्चर्य वाटले. एक प्रकारे तिने अविश्वास प्रकट केला. तेव्हा तिला दुर्वांचे महत्व पटावे म्हणून त्यांनी तिच्या हातात एक दुर्वांची जुडी दिली आणि सांगितले की इंद्राकडे जाऊन तिच्या भाराचे सुवर्ण घेऊन ये. आपल्या पतीच्या आदेशानुसार आश्रया इंद्राकडे गेली आणि तिने आपल्या पतीचा निरोप इंद्राला सांगितला. ते ऐकून इंद्रही विचारात पडला. त्याने आपला सेवक तिच्यासोबत देऊन तिला कुबेराकडे पाठवले.





## आनंदी पहाट

# अर्थकारण हा वर्चस्वाचा मूलभूत घटक

आधुनिक केसरी



विद्यावाचस्पती विद्यानंद
संपर्क क्र. 7709612655

ब्रिटिशांनी भारत सोडला तेव्हा औद्योगिक पायाभूत सुविधा खराब होत्या. स्वातंत्र्यानंतर भारताने नियोजित आर्थिक विकासाचा पर्याय निवडला. थ्रस्ट आणि जड उद्योग विकसित करणे ही मुख्य चिंता होती. त्यामुळे वेगाने औद्योगिकीकरण सुरू झाले. येथे, हे लक्षात घेणे महत्त्वाचे आहे की आपली आर्थिक धोरणे समाजाभिमुख होती आणि राज्य नियंत्रित होती. भारताने संमिश्र अर्थव्यवस्था पद्धतीचा अवलंब करण्यास सुरुवात केली. पण ऐंशीच्या दशकाच्या उत्तरार्धात आणि १९९०च्या दशकाच्या सुरुवातीला भारतीय धोरणकर्त्यांना हे लक्षात आले की, राज्य नियंत्रित अर्थव्यवस्था जवळपास ४५ वर्षांत अपेक्षित परिणाम देऊ शकत नाही. उदारीकरण, खाजगीकरण आणि जागतिकीकरणाच्या या युगात, भारताने अर्थव्यवस्थेच्या काही क्षेत्रांमध्ये वेगवान वाढ पाहिली आहे, जरी भारताने नवीन आर्थिक धोरणाचा अवलंब करण्यास सुरुवात केली, तेव्हा चांगले परिणाम अपेक्षित होते. अर्थशास्त्राचा अभ्यास का महत्त्वाचा आहे, हे समजून घेण्यासाठी प्रथम अर्थशास्त्र म्हणजे काय हे समजून घेतले पाहिजे. ढाक्याची मलमल, बंगालची कॅलिको, काश्मीरची शाल, कापड आणि हस्तकला, मिरपूड, दालचिनी, अफू

आणि नीळ यांसारखी कृषी उत्पादने सोने आणि चांदीच्या बदल्यात युरोप, मध्य पूर्व आणि दक्षिण पूर्व आशियामध्ये निर्यात केली गेली. १६व्या शतकात युरोपीय लोकांच्या आगमनाने व्यापार आणि वाणिज्य पूर्णपणे बदलले. युरोपीय लोकांनी मुख्यत्वे मसाले, हस्तकला, सुती कपडे, नील इत्यादींवर लक्ष केंद्रित केले. सर्व युरोपीय शक्तींपैकी

ब्रिटीशांनी सर्वात मजबूत सिद्ध केले आणि त्यांच्या प्रतिस्पर्ध्यांना भारतातून हाकलून दिले. हळुहळू आणि हळूहळू ब्रिटिशांनी राजकीय वर्चस्व संपादन करून भारतावर ताबा मिळवला आणि स्वतःच्या गरजेनुसार भारतीय अर्थव्यवस्थेचा नाश केला. ब्रिटीश राजवट भारतात स्थापन झाल्यावर भारतातून संपत्तीचा निचरा होऊ लागला.



आधुनिक केसरी

**ब्रह्मानंदी टाळ | निनादतो ||**
व्हावे सदा लीन | सत्कर्माचे ठायी ||
पुण्य फळ देई | निष्कामता ||१||
त्रिगुणाचे अंगी | विकाराची सत्ता ||
तीने सकामता | फोफावली ||२||
माया मोह सारे | दुःखाचे कारण ||
जीतेपणी मरण | भोग सारे ||३||
कर्माचे तू वर्म | जाण माझ्या मना ||
फिटेल रे दैना | जन्माची ह्या ||४||
ज्याचे दारी उभा | सोन्याचा पिंपळ ||
ब्रह्मानंदी टाळ | निनादतो ||५||



प्रा.ज्ञानेश्वर कुलकर्णी (वतनी)
संपर्क क्र. ९४०३०२९१७८

## निरूपण

आधुनिक केसरी


नित्याराध्याभिवन्द्यां त्वां
श्रीजमदग्निवल्लभाम्|
तापत्रयविनाशाय दुर्गां देवीं नमाम्यहम्
|| १०१ || नित्य आराध्य, वंद्य अशा तुला
श्रीजमदग्नीवल्लभेला दुर्गा देवीला तिन्ही
तापांच्या शांतीसाठी मी नमस्कार करतो.



डॉ. चन्द्रहासशास्त्री
सोनपेठकर

## घराघरात स्वर्वेद, मनामनांत स्वर्वेद, जनमनांत स्वर्वेद !

प्रकटें युग युग जगत में, सार शब्द उपदेश
। विरही अनुरागी मिलैं, दुर्लभ उन
आदेश ।।५७।।(स्वर्वेद पंचम *मण्डल
दशम अध्याय) ०५/१०/५७
मूळ भाष्याचा मराठी अनुवाद :
नित्य अनादि सद्गुरूदेव चारही युगांमधे
प्रगट होऊन विरही, अनुरागी जीवांना
भेटून सारशब्दाचा दुर्लभ उपदेश
करतात. त्यांच्या आदेशात अनुरागी जीव
अध्यात्म-मार्गात अग्रेसर होऊन आपले
लक्ष्य प्राप्त करतात.



स्वर्वेद रचनाकार
अनन्त श्री सद्गुरू
सदाफल देवजी
महाराज

संदर्भ : हा ग्रंथ तुम्हाला हवा असल्यास
वॉट्सअॅप करा ८५५४८८३१६६.

## गहिनीनाथ

यांप्रमाणे प्रकार घडल्याची बातमी गावभर झाली. तेव्हा गावचे लोक भेटीस जाऊन मुलाची चौकशी करीत तेव्हा नाथहि सर्व वृत्तांत सांगत; तो ऐकून त्यांना नवल वाटे. मच्छिंद्रनाथाने आपल्या शिष्याकडून मातीचा पुतळा जिवंत करविला, ह्यास्तव ब्रह्मदेवापेक्षा मच्छिंद्रनाथाची योग्यता विशेष होय, असे जो तो बोलू लागला




तेथून पुढे तीर्थयात्रा करीत फिरताना मुलासहि बरोबर नेणार असा मच्छिंद्राचा मानस पाहून, त्यामुळे मुलाची अनास्था होईल मुलाचे आईवाचून संरक्षण व्हावयाचे नाही, म्हणून मुलास कोणाच्या तरी हवाली करा, असे पुष्कळांनी मच्छिंद्रनाथांस सुचविले. ते ऐकून, तसे होईल तर फारच चांगले होईल असे नाथाने उत्तर दिले. अशा तऱ्हेने मच्छिंद्रनाथांचा रुकार मिळाल्यानंतर मुलास कोणाच्या तरी माथी मारावा असा गावकऱ्यांनी घाट घातला. मग मधुनाभा या नावाचा एक ब्राह्मण तेथे राहात होता. त्याची गंगा ह्या नावाची स्त्री महापतिव्रता होती. उभयता संतती नसल्याने नेहमी रंजीस असत व त्यांस कोणत्याच गोष्टीची हौस वाटत नसे. ते दोघे ह्या मुलाचा प्रतिपाळ आस्थेने करतील असे जाणून त्यांच्याबद्दल सर्वांनी मनापासून मच्छिंद्राकडे शिफारस केली. मग अशा लोकप्रिय स्त्रीपुरुषांच्या हातात गहिनीनाथांसारखे रत्न देणे नाथासहि प्रशस्त वाटले. त्याने मुलास गंगाबाईच्या ओटीत घातले आणि सांगितले की, मातोश्री ! हा पुत्र वरदायक आहे. करभंजन म्हणून जो नवनारायणांपैकी एक त्याचाच हा अवतार आहे. ह्याचे उत्तम रितीने संगोपन कर, तेणेकरून तुझे कल्याण होईल व जगाने नावाजण्यासारखा हा निपजेल; हा पुढे कसा होईल हे मातोश्री, मी तुला आता काय सांगू ? पण याचे सेवेसाठी मूर्तिमंत कैलासपति उतरेल. ज्याचे नाव निवृत्ति असेल त्यास हा अनुग्रह करील. याचे नाव गहिनीनाथ असे ठेव. आम्ही तीर्थयात्रेस जातो. पुन्हा बारा वर्षांनी हा आमचा बाळ गोरक्षनाथ येथे येईल, तेव्हा तो ह्यास अनुग्रह करील. मग मोहनास्त्र मंत्र म्हणून विभूति तिचे अंगावर टाकताच, तिच्या स्तनात दूध उत्पन्न झाले. मग मुलास स्तनपान करविल्यानंतर तिने गावातील सुवासिनी बोलावून मुलास पाळण्यात घालून गहिनीनाथ असे त्याचे नाव ठेविले.पु ढे मच्छिंद्रनाथ काही दिवस तेथे राहिला व गावकऱ्यांची रजा घेऊन गोरक्षासहवर्तमान तो तीर्थयात्रेस गेला. जाताना गोरक्ष अजून कच्चा आहे असे मच्छिंद्रनाथास दिसून आले. मग त्यास बदरिकेद्वार स्वामींच्या हवाली करून तपास लावावे असे मनात जाणून अनेक तीर्थयात्रा करीत करीत ते बदरिकाश्रमास गेले. मच्छिंद्रनाथास सोन्याच्या विटेचा मोह, समाराधना, गहिनीनाथास गोरक्षाचा उपदेशमच्छिंद्र व गोरक्षनाथ सौराष्ट्र गावांहून निघाले ते मार्ग क्रमीत तैलंगणांत गेले. तेथें त्यांनीं गोदेचे संगमीं स्नान करून श्रीशिवाचे पूजन केले. पुढे आंवढ्यानागनाथ, परळीवैजनाथ आदिकरून तीर्थे केल्यावर महारण्यात गर्भागिरी पर्वतावर जे वाल्मीकिऋषीचे स्थान आहे, तेथे ते आले.

# नाम निष्ठेने घ्यावे

आधुनिक केसरी

नाम श्रध्देने घेणे म्हणजे काय ? तर आपल्या गुरूने किंवा ज्याच्याबद्दल आपली पूज्य भावना असते अशा व्यक्तीने सांगितले म्हणून घेणे. अशा श्रद्धेने नाम घेणाऱ्याच्या मनात शंका येत नाही. ही स्थिती फार भाग्याची पण तितकीच दुर्मिळ. निष्ठेने नाम घेणे म्हणजे शंकारहित नाम घेणे. शंका अनेक तऱ्हेच्या असतात. नाम घेताना भगवंताकडे लक्ष नसले तर त्या नामाचा उपयोग आहे की नाही, नाम घेताना बैठक कोणती असावी, दृष्टि कशी असावी, शुचिर्भूतपणेच नाम घ्यावे किंवा कसे, अशा तऱ्हेच्या अनेक शंका मनात येतात. थोडक्यात असे म्हणता येईल की, आपण जे नाम घेतो ते भगवंतापर्यंत पोहोचते की नाही, ह्या एका शंकेत सर्व शंकांचा समावेश होतो. भगवंत आणि त्याचे नाम एकरूपच असल्याने त्या दोहोंच्या आड काहीच येऊ शकत नाही. एखाद्या व्यक्तीच्या पाठीमागून आपण चाललो असताना आपल्या तोंडून त्याचे नाव उच्चारले गेले तर तो लगेच मागे वळून बघतो. ही जर मनुष्याची स्थिती तर



भगवंताच्या बाबतीत त्याचे नाव त्याच्यापर्यंत पोहोचत नाही हे कसे शक्य आहे ? खरे पाहिले तर भगवंताचे नाव त्याच्याच कृपेने आपल्या मुखात येते; म्हणजे त्याचे नाव तोच घेत असतो; मग नाम भगवंतापर्यंत पोहोचते की नाही ह्या शंकेला वावच कोठे राहिला ? समजा दोन माणसे जेवायला बसली. त्यांतल्या एकाच्या मनात काही विचार घोळत असून त्याचे जेवणाकडे लक्ष नव्हते, पण हाताने तोंडात एकेक घास घालण्याचे काम चालू होते. दुसरा इसम मात्र लक्षपूर्वक जेवण जेवीत होता. दोघेही जेवून उठले. ह्यात उपाशी कोण राहिला ? दोघांचीही पोटे भरलीच ! तसे नाम घेतल्यानंतर त्याचा उपयोग झाला नाही असे कसे होईल ? समजा आपण परगावच्या एका अनोळखी इसमाला पत्र लिहून त्याला बोलाविले; तो आला आणि त्याने सांगितले की, 'तुम्ही ज्याला पत्र पाठविले तोच मी', तर त्याच्या वचनावर विश्वास ठेवून आपण त्याला जवळ करतो. तसे, भगवंताने सांगितले आहे की 'जेथे माझे नाम तेथे मी पुरूषोत्तम'; तर मग या वचनावर विश्वास ठेवून नाम घ्यावे आणि त्यातच त्याला पहावे, असे का करता येऊ नये ? हीच श्रध्दा. आपण ज्याचे पोटी जन्माला आलो त्याचेच नाव आपल्या पुढे लावतो तसे भगवंताच्या बाबतीत करावे. त्याचेच नावाने जगावे; म्हणजे माझा सर्व कर्ता, रक्षिता तो एकच असून त्याच्याशिवाय माझे या जगात दुसरे कोणीही नाही, या भावनेने राहावे. असा जो भगवंताचा होतो त्याचे महत्व भगवंत स्वतःपेक्षाही वाढवतो.



चला धाब्यावर जाऊ... पान ६

# आधुनिक केसरी

विश्वव्यापी मराठी दैनिक

मंगळवार, ३ ऑक्टोबर २०२३



ट्रुडो यांचा आडमुठेपणा : कॅनडाला फटका पान ७


# ऊस दर निश्चित झाल्याशिवाय कारखान्यांचे धुराडे पेटू देणार नाही

## पैठण येथे स्वाभिमानी शेतकरी संघटनेचा इशारा

आधुनिक केसरी न्यूज

**पैठण :** चालू वर्षीच्या उस गळीत हंगामाचा बिगुल वाजू लागला आहे. या पार्श्वभुमीवर चालू वर्षी स्वाभिमानी शेतकरी संघटनेच्यावतीने पैठण येथे संभाजीनगर, अहमदनगर दोन जिल्यातील पदाधिकाऱ्यांनी ऊस दराबाबत बैठक घेण्यात आली. यावेळी अहमदनगर येथील स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे ज्येष्ठ पदाधिकारी अढाव यांनी शेतकर्याची कशी मुस्कटदाबी सरकारने मागील वर्षी कांदा, ऊस, कापूस, दराबी केली याचे सविस्तर वर्णन करून मागील वर्षीचा 300 रूपये फरक देण्यात यावे,तसेच ऊसाला 3100 रूपये पहीला हप्ता देवुन 200 रूपये दुसरा हप्ता देण्यात यावा नसता यंदाच्या गळीत हंगामात साखर कारखान्याचे धुराडे पेटु देणार नाही, याबाबत येत्या 3 ऑक्टोबरला आंदोलन उभारले जाणार असुन ऊस उत्पादक शेतकऱ्यांनी स्वाभीमानी संघटनेला साथ द्यावे, असे अवाहन केले. ऊस पिकाबाबत होत असलेला खर्चाचा ताळेबंद कसा खर्च होतो याबाबत स्वाभिमानीचे संभाजीनगरचे जिल्हाध्यक्ष माऊली यांनी कारखानदार नेहमीच नफ्यात असुन सुध्दा ऊसाला योग्य भाव मिळत नाही. त्यामुळे यंदाच्या गळीत हंगामात ऊसाला 3100 रूपये भाव दिलाच पाहिजे यासाठी शेतकऱ्यांनी एकत्र येवून अंदोलनात सहभागी व्हावे. यावेळ शेवगावचे तालुकाध्यक्ष भोसले मेजर नगरचे जिल्हा सरचिटणीस बाळासाहेब फटांगडे शेवगाव शहराध्यक्ष अमोलजी देवडे शेवगाव युवा अध्यक्ष हरिभाऊ कबड्डी शेवगाव तालुका उपाध्यक्ष विकास साबळे ,उपाध्यक्ष मच्छिंद्र आरले, संभाजीनगर



जिल्ह्याचे युवा जिल्हाध्यक्ष शिवाजीराव साबळे पैठण तालुका अध्यक्ष संतोष तांबे , बाबुराव बोरुडे बंडू दरपळे, सचिन बोडके, चंद्रकांत धारगड ,मोहन खताळ, भोसले पाटील उद्धव मापारी, योगेश गोणे ,सुखदेव लबडे , पिंटू वाकडे ,महेश सर , सलीम भाई सह पदाधिकारी उपस्थित होते.

# रिसोड येथील बाजार समितीत उद्या हळद परिषदेचे आयोजन

## भूमिपुत्र शेतकरी संघटनेचा उपक्रम

आधुनिक केसरी न्यूज

**वाशिम :** भूमिपुत्र शेतकरी संघटनेचे संस्थापक अध्यक्ष विष्णुपंत भुतेकर यांच्या वाढदिवसाचे औचित्य साधुन, संघटनेच्या वतीने रिसोड कृषि उत्पन्न बाजार समितीच्या आवारात भव्य हळद परिषदेचे आयोजन करण्यात आले आहे. दि.४आक्टोबर रोजी सकाळी ११ : ३० वा. सदर परिषदेला सुरुवात होणार असून, त्याच दिवशी सायंकाळी ठिक ७:३० वाजता महाराष्ट्रातील नामवंत महिला कीर्तनकार परतूर येथील भागवताचार्य रूपालीताई सवणे यांचा जाहीर कीर्तनाचा कार्यक्रम होणार आहे. सदर कार्यक्रमाचा जिल्हयातील सर्व शेतकऱ्यांनी आणि भाविक भक्तांनी जास्तीत जास्त संख्येने लाभ घ्यावा असे आवाहन भूमिपुत्र शेतकरी संघटनेच्या वतीने करण्यात आले आहे.

जिल्ह्यातील रिसोड, मालेगाव व इतर तालुक्यातील सुद्धा शेतकऱ्यांनी पर्यायी पीक म्हणून " हळद पीक " लागवडीला प्राधान्य दिले आहे. तद्वतच वाशिम,रिसोड व नजीकच्या हिंगोली येथे हळद विक्रीसाठी बाजार उपलब्ध झाल्यामुळे अधिकची सोय झाली आहे.परिणामी हळद हे हमीपीक असल्याने जिल्हयात हळद उत्पादक शेतकऱ्यांची संख्या पूर्वीपेक्षा कमालीची वाढली आहे.त्या दृष्टीने हळद उत्पादक शेतकऱ्यांना पुर्वमशागती पासून प्रक्रियेपर्यंत लागणारे तंत्रज्ञान अधिक अवगत व्हावे या उद्देशाने हळद परिषदेचे आयोजन करण्यात आले असल्याची माहिती संघटनेच्या सुत्रांनी दिली आहे. सदर परिषदेचे उद्घाटन राज्यस्तरीय हळद संशोधन व प्रक्रिया अभ्यास समितीचे संचालक तथा रिसोडचे आ. अमित झनक यांच्या हस्ते होणार आहे. तर कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान बाजार समितीचे सभापती संजय शिंदे व उपसभापती राजूभाऊ आरू हे संयुक्तरित्या भूषविणार आहेत. प्रमुख मार्गदर्शक म्हणून, वाशीमचे जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी आरिफ शहा, जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था दिग्विजय राठोड, परभणीचे सेवानिवृत्त उपविभागीय कृषी अधिकारी डॉ. डी.बी. काळे,तसेच इंडोकेम इंडिया प्रायव्हेट लिमिटेडचे कार्यकारी संचालक मिलींद आहेर आदींचे मार्गदर्शन लाभणार आहे. या कार्यक्रमासाठी विशेष उपस्थिती म्हणून, मराठवाडा/विदर्भ हळद असोशियनचे अध्यक्ष तथा माजी आमदार गजानन घुगे, कळमनुरिचे सूर्याजी शिंदे, अकोला येथील हळद खरीददार आशिष चंद्रराणा, दवे का दिव्य मसाला कंपनीचे धिरजभैय्या दवे आदींची उपस्थिती राहणार आहे.तर, प्रमुख उपस्थितांमध्ये बाजार समितीचे संचालक सर्व श्री, शामराव उगले, गजानन पाचरणे, धनंजय बोरकर, बबनराव सानप, भगवान गाडे, रविभाऊ चोपडे, भैय्यासाहेब देशमुख, गजानन अवताडे, शाम महाराज खराटे,सौ. इंदूबाई तेजराव वानखेडे,सौ. चंद्रभागाबाई भाऊराव गरड, भिमराव शेजुळ, पुरुषोत्तम तोष्णीवाल, रमेश गायकवाड, रामचंद्र बुधनेर आदी उपस्थितीत राहणार आहेत. सदर मार्गदर्शनाचा शेतकऱ्यांनी लाभ घ्यावा असे आवाहन भूमिपुत्र शेतकरी संघटनेकडून करण्यात आले असून, सायंकाळी होणाऱ्या जाहीर किर्तन श्रवणाचा लाभ तालुक्यातील सर्व भाविक भक्तांनी व महिलांनी घ्यावा अशी विनंती सुद्धा करण्यात आली आहे. किर्तन कार्यक्रमासाठी टीव्ही स्टार मृदंगाचार्य मंगेश महाराज जाधव, गजानन महाराज कव्हर तर गायनाचार्य बालासाहेब महाराज सुरेगावकर, ज्ञानेश्वर महाराज वाघ,आणि विदर्भ रत्न संगीत विशारद मनोहर महाराज अवचार यांची साथसंगत लाभणार आहे. मालेगांव तालुक्यातील कोठा येथील हरिबापू वारकरी संस्था व परिसरातील भजनी मंडळाचे सहकार्य लाभणार असल्याची माहिती भूमिपुत्रच्या सुत्रांनी दिली आहे.

# मराठा समाजाला आरक्षण मिळेपर्यंत स्वस्थ बसणार नाही

## मराठा योद्धा जरांगे पाटील याचा एल्गार

आधुनिक केसरी न्यूज

**सिद्धार्थ वाठोरे**

**हदगाव :** सर्वसामान्य मराठा शेतकऱ्याच्या घरात जन्मलेला मुलगा आहे. मला समाजाच्या वेदना आणि व्यथांची मला जाणीव आहे. त्यामुळे मराठा समाजाला आरक्षण मिळेपर्यंत मी स्वस्थ बसणार नाही, असा एल्गार मनोज जरांगे पाटील यांनी केला. हदगाव येथील सुमन गार्डन येथे जरांगे पाटील यांची जाहीर सभा झाली शहरात त्याच्या स्वागताचे बॅनर लावण्यात आले होते. जेसीबीच्या साहाय्याने जरांगे पाटील यांच्यावर फुलांचा वर्षीव करण्यात आला होता. मराठा आरक्षण आता दृष्टीपथात आहे कुणबी प्रमाणपत्रांसाठी हजारो पुरावे शासनाला दिले आहे पण वंशावळी असलेल्यांनाच कुणबी पत्र देण्याचा



निर्णय शासनाने दिला होता. परंतु एकास एक न्याय व दुसऱ्यास एक असे कदापिही होऊ देणार नाही. सरसकट कुणबी प्रमाणपत्र दिल्याशिवाय शांत राहणार नसल्याचेही जरांगे पाटील यांनी सांगितले आहे.

मराठा समाजाने अत्यंत शांततेने आपल्या हक्कांसाठी लढत आहे. या समाजाने जवळपास ५८ इतके मोर्चे राज्यभरात काढले. ते अत्यंत शिस्तबद्ध पद्धतीचे होते. अत्यंत प्रामाणिकपणे आणि नेटाने हे मोर्चे काढले जात होते. कुठेही त्याला गालबोट लागले नाही. परंतु, काही स्वार्थी राजकीय नेते मराठा तरुणांच्या आडून आपला स्वार्थ साधत आहेत. मराठा समाजातील तरुणांनी कुठल्याही नेत्याच्या स्वार्थी राजकारणाला बळी पडू नये. आणि भावनिक होऊन कुठलेही टोकाचे पाउल उचलु नये असे आवाहनही त्यांनी यावेळी केले.

लोकशाही मार्गाने आंदोलन अवलंबून उपोषण सुरू असताना दरम्यान समाजबांधवांवर हल्ला चढवला. त्यामुळे सर्वच गंभीर जखमी झाल्याने माझ्या समाजाच्या महिला भगिनीने काहीही करून आता माघार घ्यायची नसल्याचे सुचवल्यानंतर अधिक ताकतीने शासनासमोर लढत होतो. समाजासाठी उपोषण आंदोलन करणे चुकीचे आहे का? असाही सवाल या निमित्ताने मनोज जरांगे पाटील यांनी केला.

# दुर्मिळ प्रजातीच्या कासवांची ९५५ पिल्ले ताब्यात

आधुनिक केसरी न्यूज

**नागपूर :** गंगा नदीच्या पात्रात आढळणाऱ्या दुर्मीळ प्रजातीच्या कासवांच्या पिल्लांची तस्करी करण्यात येत होती. महसूल गुप्तचर संचालनालयाच्या (डीआरआय) पथकाने नागपूरसह देशातील, चेन्नई, भोपाळ आणि अन्य तीन शहरात छापे टाकून कासवांची ९५५ पिल्ले जप्त केली. याप्रकरणी सहा तस्करांना अटक करण्यात आली. 'डीआरआय'ने प्रसिद्धीला दिलेल्या पत्रकानुसार गंगा नदीत टेंट टर्टल, इंडियन फ्लॅपशेल टर्टल, क्राऊन रिव्हर टर्टल, काळे डाग असलेले कासव आणि तपकिरी छताचे कासव या दुर्मीळ प्राजातीच्या कासवाची पिल्ले आढळतात. आंतरराष्ट्रीय स्तरावर या पिल्लांची तस्करी करण्यात येते.

# पुण्यातील धरणांमध्ये ९७.४१ टक्के पाणीसाठा

आधुनिक केसरी न्यूज

**पुणे :** खडकवासला धरण साखळी प्रकल्पातील चारही प्रमुख धरणांतील पावसाचा जोर कमी झाला आहे. मात्र खडकवासला धरणातून पाण्याचा विसर्ग कायम आहे. खडकवासला, पानशेत, वरसगांव आणि टेमघर या चारही धरणांत मिळून एकूण ९७.४१ टक्के म्हणजे २८.३९ अब्ज घनफूट एवढा पाणीसाठा जमा झाला आहे. गेल्या वर्षी याच तारखेला ९९.८३ टक्के म्हणजे २९.१० अब्ज घनपूट पाणी धरणसाखळी प्रकल्पात होते, अशी माहिती राज्याच्या जलसंपदा विभागाकडून देण्यात आली.




# सरकार बॅकफूटवर

आधुनिक केसरी

सावळजसह नऊ गावांचा टेंभू योजनेत समावेश करण्यासाठी दिवंगत आरआर आबा उर्फ माजी मंत्री आर. आर. पाटील यांच्या पत्नी आमदार सुमनताई पाटील यांनी उपोषणाचे हत्यार उपसले. त्यांनी उपोषणाचे हत्यार उपसताच राज्य सरकार बॅकफूटवर आले आहे. सुमनताई आजपासून सांगली जिल्हाधिकारी कार्यालयाबाहेर आमरण उपोषणाला बसणार होत्या. त्या उपोषण स्थळाकडे निघाल्या होत्याच तेवढ्यात राज्य सरकारने त्यांच्या मागण्या मान्य केल्या आहेत. मात्र, आपल्या इतरही मागण्या मान्य होईपर्यंत आपला लढा सुरूच राहील, असे सुमनताई यांनी म्हटले आहे. आमदार सुमनताई पाटील यांच्या आमरण उपोषणा आधीच शासकीय यंत्रणा लागली कामाला लागली. टेंभू विस्तारित योजनेसाठी 8 टीएमसी पाणी उपलब्ध करून द्यायला महाराष्ट्र शासनाकडून अंतिम मंजुरी देण्यात आली आहे. सुमनताई पाटील यांच्या प्रमुख मागण्यांपैकी पहिली मागणी उपोषण सुरू होण्याआधीच मान्य झाली आहे. मात्र टेंभू योजनेच्या अहवालाला तृतीय सुधारित मान्यता मिळेपर्यंत लढा सुरूच राहणार असल्याचे सुमनताई यांनी म्हटले आहे. टेंभू सिंचन योजनेत तासगाव आणि कवठेमहांकाळ तालुक्यातील 17 गावांचा समावेश करावा, या मागणीसाठी राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटाच्या आमदार सुमनताई पाटील आजपासून उपोषण करणार होत्या. सांगली जिल्हाधिकारी कार्यालयासमोर त्या बेमुदत उपोषणाला सुरुवात करणार होत्या. मुलगा रोहित पाटील आणि दुष्काळग्रस्त शेतकऱ्यांना घेऊन उपोषण करण्याचा इशारा त्यांनी दिला होता. मंजूर असताना ही वारंवार मागणी करून ही प्रशासनाकडून पाण्यापासून वंचित असणार या गावांचा टेंभू योजनेत समावेश करण्यात येत नसल्याने सुमनताई आणि रोहित पाटील यांनी राज्य सरकार विरोधात थेट बेमुदत उपोषणाचा निर्णय घेतला होता. बोंडारवाडी प्रकल्पासह सातारा जिल्ह्यातील कृष्णा प्रकल्पाच्या फेरजलनियोजनास राज्य शासनाने मान्यता दिली आहे. त्यासंदर्भात 30 सप्टेंबर रोजी सुधारित शासन निर्णय देखील जाहिर करण्यात आला आहे. दुष्काळी खानापूर आटपाडी आणि विसापूर सर्कल तासगाव तालुक्यातील 34 गावातील शेतकऱ्यांना टेंभू योजनेचे हक्काचे पाणी मिळावे, यासाठी आमदार अनिल बाबर पाठपुरावा करत आहेत. टेंभू विस्तारीत योजनेसाठी 8 टी. एम. सी.पाणी उपलब्ध करुन देण्यास राज्य शासनाने मंजूरी दिली आहे. टेंभू योजनेच्या तिसऱ्या सुप्रमास लवकरच मान्यता देण्यात येणार असल्याचेही सरकारने स्पष्ट केले आहे.

# गांधीजी-शास्त्रीजींच्या पश्चात आपण त्यांचे काय केले ?



प्रा. डॉ. विठ्ठल जायभाये
संपर्क क्र. 9158064068

आधुनिक केसरी

**आज राष्ट्रपिता महात्मा गांधी आणि स्वतंत्र भारताचे दुसरे पंतप्रधान लाल बहादूर शास्त्री यांच्या जयंतीचा संयुक्त दिवस! या दोन्हीं महापुरुषांच्या जयंतीनिमित्ताने त्यांच्या महान कार्याला आणि स्मृतींना विनम्र अभिवादन! आज ज्या दोन महापुरुषांची जयंती सर्वत्र देश आणि राज्यभर संपन्न होत आहे, त्यांच्या पश्चात आपण त्यांच्या मूल्य-तत्व-कार्यप्रणालीचे काय केले? यावर कृतीशील चिंतन-मंथन होणे काळाची गरज आहे. अलीकडच्या काळात राजकारण मोठ्या झपाट्याने बदलले आहे. राजकारणातील सुचिता पार धुळीला मिळाली आहे. एक काळ होता जेंव्हा सामान्य माणूस राजकारणी व्यक्तीकडे मोठ्या सन्मानाने पहायचा! हा नेता माणूस नक्कीच आपल्या भागाचे, राज्याचे आणि देशाचे भले करील(!) असा आशावाद सामान्य माणसांच्या मनात असायचा.**





मात्र अलीकडच्या दोन दशकात सर्व काही बदलले आहे. वर्तमान राजकारणी लोकांनी तर पक्षनिष्ठा, विचार प्रणाली, तत्वे इत्यादी आदर्श बाबी केवळ पुस्तकात वाचायला शिल्लक ठेवल्या आहेत! जवळपास सर्वच राजकारणी लोकांवरचा सामान्य माणसाचा विश्वास उडाला आहे. कोण काय करतोय? कोण कुठे आहे? कोण किती खरं बोलतोय? कोण कुणाला उजागर-चोरून भेटतोय? याचा लेखाजोखा सामान्य माणसाजवळ आहे. परिणामी आज माणसे राजकारणी माणसांना केवळ समोरासमोर सन्मान देतात आणि बाजूला सरकले की; "हा किती बदफैली, भ्रष्ट, व्यभिचारी, वाळू चोर, गिट्टी चोर, रस्ते चोर, संडास चोर, गोरगरिबांची शेती चोर, सरकारचा टॅक्स चोर, वीज चोर आहे" याची मोठ्या चवीने चर्चा करतात. आज गांधीजी आणि शास्त्रीजींच्या प्रतिमेला पुष्पहार घालणारे हात कसे आहेत? हा सुद्धा विचार नक्की व्हायला हवा!

हे युवकांनो, आपली विरासत म्हणजेच आपला देदीप्यमान इतिहास नीट समजून घ्या! तुमच्या हाती उद्याच्या उज्वल भविष्याची कमान आहे. तुम्हीच उद्याच्या भारताचे शिल्पकार आहात! आपण आपले ऐतिहासिक महापुरुष आणि त्यांचे कार्य व्यवस्थित समजून घेतले पाहिजे. कुणी मिडीयावर एखाद्या महापुरुषांविषयी चुकीची पोस्ट केली असेल तर आपण त्याच्या मुळाशी जाऊन, विवेक जागृत ठेवून ती पोस्ट प्रसारित करावी. त्यानंतर त्यावर आपली प्रतिक्रिया दिली पाहिजे अन्यथा तिला दुर्लक्षित करायला हवे. तुमच्या माझ्या हातात मिडिया नावाचा हा महासागर असून यातून आपण अगदी चातकासारखे सातत्याने ज्ञानामृताचे कण वेचले पाहिजे. असे झाल्यास कुणीही तुमच्या तारुण्य शक्तीचा गैरवापर करणार नाही. राष्ट्रपिता महात्मा गांधीजींचे भारतीय स्वातंत्र्य संग्रामात आणि एकूणच देशाच्या उभारणीत मोलाचे योगदान राहिले आहे. लोकमान्य टिळक, नेताजी सुभाषचंद्र बोस, भगतसिंग, डॉ.बाबासाहेब आंबेडकर आदि धुरिणांचे योगदानही दुर्लक्षून चालणार नाही, परंतु आज गांधी-शास्त्री यांची जयंती असल्यामुळे त्यांच्यावर कटाक्ष टाकणे अगत्याचे आहे. गांधीजींनी व्रतस्थ जीवन जगतांना उपोषण, असहकार, सत्य, अहिंसा इत्यादी आत्मिक बाबींचा इंग्रज सत्तेच्या विरोधात मोठ्या चतुराईने वापर केला. याचा परिणाम इंग्रजांना आपला भारत देश स्वतंत्र करावा याची जाण झाली. गांधीजींनी शिक्षण संदर्भात "नयी तालीम" हा अत्यंत मूलगामी, कृतीशील कार्यक्रम आखला आणि तो प्रत्यक्ष सिद्ध करून दाखवला. यामध्ये शासनाने ७ ते १४ वर्षापर्यंत निःशुल्क आणि अनिवार्य मुलभूत शिक्षण द्यावे. स्वावलंबी आणि मातृभाषेत शिक्षण द्यावे. पाचवी पर्यंत सर्वांना एकच शिक्षण द्यावे. बालकांना शेती, ग्रामीण उद्योग, हस्तकला व्यवसाय, संगीत, चित्रकला, सामाजिक अध्ययन, सामान्य विज्ञान आणि शारीरिक शिक्षण इत्यादी गोष्टी अनिवार्य करून शालेय काळात बनवलेल्या कलाकृतींना बाजारात विकून शाळेला उत्पन्न मिळवून द्यावे. राजर्षी शाहू महाराजांच्या राज्यांत लहान मुलांना शिक्षण मोफत दिले जात असे आणि जे पालक आपले लेकरू शाळेत पाठवणार नाहीत त्या कुटुंबाला १ रुपया दंड लावला जायी. गांधीजींनी सांगितलेली नयी तालीम आणि शाहू महाराजांचे आदर्श शिक्षण आपले राज्य सरकार अंगीकारते आहे का? याचा विचार करण्याची वेळ आली आहे. या उलट आपल्या शासनाने वीस पेक्षा कमी पटाच्या सरकारी शाळा बंद करण्याचा घाट घातला असून बाकी जि.प.च्या शाळा कंत्राटदाराकडून चालवल्या जातील असा आदेश काढला आहे. शिक्षकाची भरती सुद्धा कंत्राटी पद्धतीने केली जाणार आहे. शिक्षणात ही एक प्रकारची वेठबिगारी येणार म्हणायचे का? निश्चितच हे अधोगतीचे आणि शिव-फुले-शाहू-गांधी-आंबेडकर यांच्या महाराष्ट्राला शोभणारे नाही. माणसाच्या सर्वांगीण विकासाची मुलभूत गोष्ट म्हणजे शिक्षण आणि तिच बाब जर कंत्राटी आणि महाग करून ठेवल्यास विकसित देशाचे स्वप्न कुणाच्या जीवावर पहायचे? आपण सत्तेत आहात म्हणजे इथली मूलगामी शिक्षण व्यवस्था धुळीस मिळवणार आहात का? इथला सामान्य, गाव-खेडे, तांडा-वस्ती, गोर-गरीब, ऊसतोड कामगारांच्या मुलांनी पिढ्यानपिढ्या कोयते घेऊन अजीवन ऊसतोड करत गुलामीच करायची का? शिकलेले लोक प्रश्न विचारतात म्हणून पुन्हा जनता अशिक्षितच ठेवायची आहे का? दुसरीकडे स्वतंत्र भारताच्या उभारणीत लाल बहादूर शास्त्री यांचे योगदान अनन्यसाधारण आहे. शास्त्रीजी वयाच्या अकराव्या वर्षी महात्मा गांधीजीसोबत भारतीय स्वातंत्र्य लढ्यात उतरले. चंपारण्य सत्याग्रह, रौलेट ॲक्ट, जालियानवाला हत्याकांड आदींचा त्यांच्या मनावर खोल परिणाम झाला. भारतीय स्वातंत्र्य लढ्यात सक्रीय सहभाग घेतला. भारत स्वतंत्र झाल्यानंतर केंद्रात रेल्वे मंत्री, विदेश मंत्री आणि गृह मंत्री इत्यादी महत्वपूर्ण खाती सांभाळली. १९६४ साली नेहरूंचे निधन झाले आणि शास्त्रीजी भारताचे दुसरे पंतप्रधान झाले. ते सत्तेवर आल्याबरोबर पाकिस्तानने भारतावर आक्रमण केले आणि त्यात भारताने विजय मिळवला. यावेळी शास्त्रीजींनी 'जय जवान, जय किसान' हा नारा देऊन श्वेत क्रांती आणि हरित क्रांती घडवून आणली. यातून शेतकरी स्वावलंबी करण्याचे प्रयत्न झाले. पंजाब, हरियाना आणि उत्तर प्रदेशात गव्हाचे उत्पन्न मोठ्या प्रमाणात आले. मरणोपरांत त्यांना भारतरत्न सन्मानाने गौरवान्वित करण्यात आले. आज हे दोन्ही महापुरुष जाऊन अनेक दशके लोटली आहेत. तरीही त्यांच्या कार्य कर्तृत्वाचा ठसा समाजमनावर खोलवर रुजलेला आहे. विद्यमान राजकारणी लोकांनी या त्यागी लोकांचा आदर्श समोर ठेवून राज्य-देश पुढे न्यायला हवे. शिक्षणाचे कंत्राटीकरन हा महाराष्ट्र शासनाचा निर्णय लोकांना अजिबात रुचला नाही. गांधीजींची आणि शास्त्रीजींची जयंती साजरी करतांना गांधीजी आणि शाहू महाराजांचा शिक्षण विषयक दृष्टीकोन समोर ठेवावा लागेल. दुसरीकडे 'जय जवान' म्हणतांना सैनिक कंत्राटी पद्धतीने भरले जाऊ नयेत. 'जय किसान' म्हणतांना शेतकऱ्यांच्या मालाला हमीभाव मिळालाच पाहिजे. संपत्ती नक्की कमवा परंतु एखाद्या व्यक्तीने किती संपती कमावली म्हणजे तो महान होईल? त्यासाठी प्रत्येक आमदार-खासदाराने आपापल्या मतदार संघातील छोट्या छोट्या शाळा दत्तक घेऊन आपली थोडीशी कमाई तिथे देऊन दानत्व दाखवावे. आपल्या भागातील शेतकरी-कष्टकरी लोकांच्या समस्या जाणून त्याची सोडवणूक करावी. असे केल्यास जनमाणसात मलीन-भ्रष्ट झालेली प्रतिमा उजळून गोरगरीब जनतेचे आशीर्वाद मिळतील! निवडणुकीच्या वेळी दारू-मटन वाटण्याची दुर्दैवी वेळ येणार नाही! पहा जमतंय का? जय जवान! जय किसान! जय विज्ञान!

# ज्येष्ठ साहित्यिक द. मा. मिरासदार



माधव पि. बैलकवाड
संपर्क क्र. 8080471642

आधुनिक केसरी

**मराठी साहित्यातील जेष्ठ साहित्यिक द. मा. मिरासदार यांचा काल म्हणजे २ ऑक्टोबर रोजी दुसरा स्मृतीदिन होता. दोन वर्षापूर्वी कालच्याच दिवशी म्हणजे २ ऑक्टोबर २०२१ रोजी त्यांचे निधन झाले होते. त्यांच्या निधनाने मराठी साहित्यातील मिरासदारी पर्वाचा अंत झाला असेच म्हणावे लागेल. द. मा. मिरासदार हे मराठीतील प्रख्यात विनोदी लेखक व कथाकथनकार होते. १४ एप्रिल १९२७ रोजी त्यांचा जन्म झाला. द. मा मिरासदार यांचे पूर्ण नाव दत्ताराम मारुती मिरासदार असे होते मात्र ते द. मा या नावानेच प्रसिद्ध झाले. द. मा मिरासदार यांनी १९५२ साली अध्यापन क्षेत्रात प्रवेश केला. पुण्याच्या कॅम्प एज्युकेशन सोसायटीच्या शाळेत ते शिक्षक होते. त्याआधी काही काळ त्यांनी पत्रकारिताही केली. १९६२ सालापासून त्यांनी कथाकथनास सुरवात केली.**

द. मा मिरासदार, व्यंकटेश माडगूळकर आणि शंकर पाटील यांनी ६० च्या दशकात संपूर्ण महाराष्ट्रभर कथाकथनाचे प्रयोग केले. त्यांच्या कथाकथनाने महाराष्ट्राला अक्षरशः भुरळ घातली. द. मा मिरासदार हे विनोदी कथा सादर करायचे. त्या कथांचे लेखनही त्यांनीच केलेले असायचे. द. मा मिरासदार यांच्या भुताचा जन्म, माझ्या बापाची पेंड, व्यंकुची शिकवणी, शिवाजीचे हस्ताक्षर, माझी पहिली चोरी, हरवल्या च्या शोध या विनोदी कथा श्रोत्यांनी अक्षरशः डोक्यावर घेतल्या.

मराठी साहित्यात विनोदी लेखनाला प्रतिष्ठा प्राप्त करून देण्यात आघाडीवर असलेले, गोष्टीवेल्हाळ ग्रामीण जीवन जिवंत करणारे आणि वाचकांच्या-श्रोत्यांच्या चेहऱ्यावर सहजपणे हसू फुलविणारे प्रा. द. मा. मिरासदार होते. शाब्दिक कोट्या आणि अंगविक्षेप म्हणजेच विनोद असे समीकरण रुजू होत असतानाच्या सध्याच्या काळात त्यांचे जाणे पोकळी निर्माण करणारेच आहे. राम गणेश गडकरी, चिं. वि. जोशी, आचार्य अत्रे, पु. ल. देशपांडे या अग्रगण्य साहित्यिकांच्या मांदियाळीत त्यांना निश्चितच स्थान आहे; पण त्यांच्या विनोदाची जातकुळी वेगळी आहे. आज काळ बदलला, ग्रामीण जीवनमान बदलले, तरी ५० वर्षांपूर्वी त्यांनी लिहिलेल्या कथा आणि त्यांचा विनोद ताजा आहे; कारण त्यांतील मानवी भावभावना, प्रवृत्ती कायम आहेत. म्हणूनच मराठी साहित्यात त्यांचे असे वेगळे स्थान आहे. अकलूज, पंढरपूर या भागांतील बालपण, वाचनाचे प्रचंड वेड, अडाणीपणाचीही कल्पना नसलेले भोवतालचे गप्पीष्ट लोक आणि प्रचंड निरीक्षणशक्ती, या जोरावर मिरासदारांनी विनोदी लेखनाची भट्टी जमवली. आपण विनोदी लेखक आहोत, हे ते अभिमानाने मिरवीत. 'विनोदी लेखक' ही पदवी



हलकीसलकी नाही; ती मिळविण्यासाठी तपश्चर्या करावी लागते, असे खुद्द त्यांनीच लिहून ठेवले आहे. लेखन, कथाकथन आणि पटकथा अशा विविध माध्यमांतून त्यांनी ही तपश्चर्या केली. ग्रामीण जीवनाचे निरीक्षण करीत विसंगती, माणसांचा विक्षिप्तपणा, बेरकीपणा, इब्लिसपणा, विसंगती टिपत त्यांनी बाबू पैलवान, नाना चेंगट, शिवा जमदाडे यांसारखी अनेक पात्रे मराठी साहित्यात अजरामर केली.

द. मा. मिरासदार यांची कथा सादर करण्याची शैली खुमारदार होती. आपल्या खुमारदार शैलीत कथा सादर करत त्यांनी महाराष्ट्राला लोटपोट हसवले. द. मा. मिरासदार यांनी विपुल प्रमाणात लेखन केले. विनोदी कथा ही त्यांची खासियत होती. द. मा. मिरासदार यांचे २४ कथासंग्रह प्रसिद्ध झाले आहेत. याशिवाय त्यांनी १८ चित्रपटांच्या पटकथाही लिहिल्या आहेत. एक डाव भुताचा या चित्रपटाची कथा- पटकथा लेखन त्यांनी केले आहे इतकेच नाही तर या चित्रपटात त्यांनी अभिनयही केला आहे. द. मा मिरासदार यांच्या विनोदी कथा ग्रामीण जीवनावर आधारित असत. ग्रामीण जीवनातील विसंगतीचे, विक्षिप्तपणाचे, इरसालपणाचे दर्शन त्यांच्या कथांतून घडत. त्यांनी केवळ विनोदीच नाही तर स्पर्श, विरंगुळा, कोणे एके काळी यासारख्या गंभीर कथाही लिहिल्या. द. मा. मिरासदार यांच्या अनेक कथांवर चित्रपट निघाले. त्यांच्या काही कथांचा समावेश शालेय अभ्यासक्रमातही करण्यात आला. त्यांना मानाचे अनेक पुरस्कार मिळाले आहेत. त्यांच्या निधनाने मराठी साहित्य विश्वात जी पोकळी निर्माण झाली आहे ती कधीही भरून न निघणारी अशीच आहे. द. मा. मिरासदार यांच्या निधनाने मराठी साहित्यातील मिरासदारीच संपली आहे असे म्हटले तरी वावगे ठरणार नाही. द. मा. मिरासदार यांना विनम्र अभिवादन!

हे पत्र संपादक, मालक, मुद्रक व प्रकाशक डॉ. प्रभू व्यंकटराव गोरे* यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लि., प्लॉट नं ए -३२, औरंगाबाद इंडस्ट्रीयल को-ऑप., सोसायटी, स्टेशन रोड, औरंगाबाद ४३१ ००५ (महाराष्ट्र) येथे मुद्रित करून प्लॉट नं. २०५, १३ वी योजना, जिजामाता कॉलनी, एन - २, सिडको, जि. औरंगाबाद (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले. ( * पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे. या अंकात प्रसिद्ध झालेल्या प्रत्येक बातमी, लेख व जाहिरातींशी संपादक सहमत असतीलच असे नाही. सर्व वाद औरंगाबाद न्यायालयाच्या कक्षेत)
आरएनआय : एमएएचएमएआर/२०२१/८२५६६, ई-मेल : aadhunikkesari@gmail.com, संपर्क : +९१ ९०७५७ १६७३९

Printed at Solapur Tarun Bharat Media Ltd., Plot No. A-32, Aurangabad Industrial Co-op, Society, Station Road, Aurangabad 431005 (Maharashtra) Plot No. 205, 13th Plan, Jijamata Colony, N - 2, CIDCO, Dist. Aurangabad (Maharashtra) and published by editor, owner, printer, and publisher Dr. Prabhu Venkatrao Gore * (* According to the PRB Act, it is the responsibility of the editor. The editor does not necessarily agree with every news, article, and advertisement published in this issue. All disputes are within the purview of the Aurangabad court.)
RNI : MAHMAR/2021/82566, E-mail: aadhunikkesari@gmail.com, Contact : +91 90757 16739

# वाशिम येथील शिवाजी विद्यालयात 'व्यक्तिमत्त्व विकास' कार्यक्रम, राजकीय-शिक्षण क्षेत्रातील तज्ज्ञांनी केले मार्गदर्शन

## मोहनलालजी बियाणी यांच्या स्मृती व्याख्यानमालेला विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद

आधुनिक केसरी न्यूज



**वसंत खडसे**

**वाशिम :** येथील श्री शिवाजी विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालयात दैनिक मराठवाडा साथीचे संस्थापक संपादक स्व. मोहनलाल बियाणी ( काकाजी) यांच्या स्मृती प्रित्यर्थ महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ मुंबई व शिक्षण संस्था संचालक संघटना वाशिम यांच्या संयुक्त विद्यमाने नुकतेच विद्यार्थ्यांचे 'व्यक्तिमत्व विकास' या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. राष्ट्रवादी काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष तथा जीवन विकास शिक्षण संस्थेचे संस्थापक अध्यक्ष श्री बाबाराव पाटील खडसे यांच्या अध्यक्षतेखाली पार पडलेल्या, सदर कार्यक्रमाचे शिक्षक आमदार किरणराव सरनाईक यांनी उद्घाटन केले. तर प्रमुख व्याख्याते म्हणून माजी प्राचार्य सुधाकर इंगोले यांनी विद्यार्थ्यांचे उद्बोधन केले.

यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून, पांडुरंग ठाकरे, भाऊसाहेब काळे, डॉ. नारायणराव गोटे, प्राचार्य अरुणराव सरनाईक, माजी प्राचार्य बी.के. देशमुख, दैनिक आधुनिक केसरीचे मुख्य संपादक डॉ. प्रभू गोरे, प्रतिनिधी संजय व्यापारी, मोहन बोरगावकर, प्रा. सोनवणे, मोहन इंगळे, माधव वानखेडे आदी मान्यवरांची उपस्थिती होती. दरम्यान स्वामी विवेकानंद विद्यालय कोकलगाव येथील विद्यार्थी गणेश हजारे यांनी केलेल्या बहारदार सूत्रसंचालनाचे मान्यवरांनी कौतुक केले. तर प्रस्ताविक कार्यक्रमाचे निमंत्रक तथा संचालक संघटनेचे जिल्हा सचिव नारायणराव काळबांडे यांनी व्यक्त केले. आपल्या प्रस्ताविकात श्री काळबांडे यांनी, " शाळा म्हणजे एक छोटेखानी समाज असून, वयाच्या सहाव्या वर्षी मुलं प्राथमिक शाळेत जाऊ लागतात. आणि येथूनच त्यांच्या वैयक्तिक ' व्यक्तिमत्व विकासाचा ' पाया




भक्कमपणे उभा राहण्यास सुरुवात होते. घरच्या वातावरणापासून शाळेच्या वातावरणात आलेले मुले, सुरुवातीला थोड्या भांबावलेल्या अवस्थेत असतात. मात्र, हळूहळू ते शालेय जीवनाशी समरस होऊ लागतात. शिक्षकांचे व्यक्तिमत्व, विविध विषयांचा अभ्यास, परिपाठ तसेच अभ्यास पूरक व सहशालेय कार्यक्रम, खेळ, क्रीडा, कवायती, सांस्कृतिक कार्यक्रम आदींचा विद्यार्थ्यांच्या वर्तनावर परिणाम होऊन त्यांचे व्यक्तिमत्व घडू लागते..! " या उद्देशाने सदर कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले असल्याची माहिती आपल्या प्रस्ताविकातून काळबांडे यांनी दिली. तर कार्यक्रमाचे प्रमुख वक्ते प्रा. सुधाकर इंगोले म्हणाले, " वाचनामुळे व्यक्तिमत्त्वाचा विकास होतो. यावेळी त्यांनी अनेक थोर पुरुषांच्या व्यक्तिमत्त्वाचे दाखले देऊन, विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. आळस, राग, चिंता, तणाव आणि मुख्यत्वे दुसऱ्याची तुलना या सर्व गोष्टी दूर करून आपल्या व्यक्तिमत्त्वाचा विकास करा..! कारण आयुष्यात यशस्वी होण्यासाठी 'व्यक्तिमत्व विकास' होणे खूप महत्त्वाचे आहे. यावेळी भाऊसाहेब काळे यांनी देखील विद्यार्थ्यांना मोलाचे मार्गदर्शन केले. सदर कार्यक्रमाचे संयोजक म्हणून पत्रकार वसंत खडसे, रुपेश बाजड, विनोद पाटील खडसे, अरविंद देशमुख आदींनी शाल व पुस्तक भेट देऊन उपस्थित मान्यवरांचा सत्कार केला. कार्यक्रमाचे निमंत्रण स्वीकारून कार्यक्रमास उपस्थित असलेले जेष्ठ पत्रकार प्रल्हाद पौळकर व भागवतराव मापारी यांचा देखील यावेळी संयोजकांनी सत्कार केला. कार्यक्रमाचे सूत्रधार म्हणून डॉक्टर प्रभू गोरे यांनी सर्वांचे आभार मानले. सदर कार्यक्रमास शेकडो विद्यार्थी व विद्यार्थिनींनी स्वयंस्फूर्तीने सहभाग घेतला.

**जीवन जगत असताना विविध बाह्य घटकांचा व्यक्तीच्या विकासावर परिणाम होत असतो :** प्रत्येक व्यक्तीचा शारीरिक, मानसिक, भावनिक व सामाजिक विकास होत असतो. या विकासातूनच तिचा पिंड घडत असतो. प्रत्येक व्यक्तीचा हा घडलेला ' पिंड ' म्हणजेच व्यक्तिमत्त्वाचा विकास होय. शरीराचा रंग व ठेवण आणि बुद्धी इत्यादी गोष्टी घेऊन प्रत्येक जण जन्माला येत असतो. मात्र काही उपजत अशा अंतर्गत गुणांना आत्मविश्वासाची सांगड घालून, जो शारीरिक व मानसिक विचारांना चालना देतो त्याच्या व्यक्तिमत्त्वाचा हमखास विकास होतो. जीवन जगत असताना, विविध बाह्य घटकांचा विशेषत : सामाजिक घटकांचा प्रत्येक व्यक्तीच्या विकासावर परिणाम होत असतो. त्यासाठी सामाजिक परिस्थितीत घडणाऱ्या व्यक्तीच्या वर्तनाची गोळाबेरीज लक्षात घेणे खूप महत्त्वाचे ठरते. कारण वर्तमान स्थितीत केवळ दिसण्याला नव्हे ; तर असण्याला खूप महत्त्व आहे..! त्यासाठी विद्यार्थ्यांनी आपले व्यक्तिमत्व अधिकाधिक प्रभावी कसे होईल यावर भर दिला पाहिजे. असे मार्गदर्शन यावेळी राष्ट्रवादी काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष बाबाराव पाटील खडसे यांनी केले.



**व्यक्तिमत्व सुधारण्याचा प्रयत्न करत असताना स्वत :ला चांगले ओळखलेले असणे जरुरीचे आहे..! :** स्वत :च्या कुवतीची दखल न घेता कुठलाही प्रयत्न न करण्यापूर्वीच, " मला जमणार नाही " असा ग्रह करून घेणे बरोबर नाही. त्यासाठी नकारात्मक विचारांना दूर सारून, सकारात्मक विचार अंगी बाळगा..! म्हणजे अवघड वाटणारे काम आपसुकच सोपे होईल..! प्रसन्न मनाने केलेल्या कामात अपयश कधीच येत नाही. म्हणूनच जगद्गुरु तुकाराम महाराजांनी सांगितले आहे, मन करा रे प्रसन्न..! साऱ्या सिद्धीचे कारण..!! हाती घेतलेले काम सिद्धीस गेल्यास, आपोआप माणसाच्या व्यक्तिमत्त्वाचा विकास होतो. आणि व्यक्तिमत्त्वाचा विकास हीच आजच्या स्पर्धेच्या युगातील अत्यंतीक गरज असल्याचे प्रतिपादन याप्रसंगी शिक्षक आमदार किरणराव सरनाईक यांनी केले.



**अंगठा कापून गुरुदक्षिणा घेणाऱ्या प्रवृत्तीपासून सावध व्हा..! :** "तुमच्यात " एकलव्या " सारखी गुरुभक्ती व विद्यार्जन करण्याची शक्ती ठासून भरलेली आहे. मात्र, आपल्या व्यक्तिमत्त्वाच्या विकासासाठी तसेच सुधारण्यासाठी इतरांच्या मदतीची आवश्यकता असते हे लक्षात ठेवणे सुद्धा जरुरीचे आहे. कारण माणूसघाणी व कुढ्या प्रवृत्तींची शक्ती आपल्या व्यक्तिमत्त्वाचा विकास कधीच होऊ देत नाही..! हे ओळखून घेतले पाहिजे. एका लगतच्या शिष्यावरील प्रेमापोटी, दुसऱ्या अहोरात्र कष्ट करून पात्र ठरलेल्या शिष्याची त्याची जात, कुळ, समाज विविध कारणे पुढे करत त्याचा अंगठा कापून त्याला दुबळा करणाऱ्या पुराणातील प्रवृत्ती आता तुम्ही इतिहास जमा केल्या पाहिजेत..! तरच तुमच्या व्यक्तिमत्त्वाचा विकास होईल..! " असे रोखठोक मार्गदर्शन जिल्हा परिषद सदस्य तथा जिल्ह्यातील राष्ट्रवादीचे ज्येष्ठ नेते पांडुरंग ठाकरे यांनी केले आहे.



# बाबासाहेबांच्या साहित्य प्रकाशन सोहळ्याच्या भव्यतेला छेद देण्याचा प्रयत्न

## आज तेविसाव्या खंडाचे प्रकाशन : केवळ दोनच सदस्य उपस्थित राहणार


आधुनिक केसरी न्यूज

**नागपूर :** भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या अप्रकाशित साहित्याचा २३ व्या खंडाचे प्रकाशन मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या दालनात मंगळवारी साडेबारा वाजता होणार आहे. मात्र या प्रकाशन सोहळ्याला डॉ. बाबासाहेब आंबेडकर चरित्र साधने समितीच्या सदस्यांना डावलण्यात आल्याची माहिती पुढे आणल्यानंतर आंबेडकरी वाचकांमध्ये असंतोष भडकला असून बाबासाहेबांच्या प्रकाशन सोहळ्याच्या भव्यतेला छेद देण्याचा प्रयत्न होत असल्याची प्रतिक्रिया उमटली. बाबासाहेबांनी १९२१ मध्ये एमएस्सी पदवीसाठी लंडन विद्यापीठाला सादर केलेला 'डिसेंट्रलायझेशन ऑफ प्रोव्हिन्शल ऑफ इम्पिरिअल फायनन्स इन ब्रिटिश इंडिया' हा प्रबंध ज्येष्ठ अर्थतज्ज्ञ डॉ. सुखदेव थोरात यांच्या मदतीने समितीला प्राप्त झाला. मात्र अर्थतज्ज्ञ डॉ. सुखदेव थोरात यांना देखील या प्रकाशन सोहळ्यासंदर्भात माहिती देण्यात आली नाही. डॉ. थोरात यांचा या खंड प्रकाशन सोहळ्यात यथोचित गौरव होणे आवश्यक होते. परंतु खंड प्रकाशनासंदर्भातील श्रेय लाटण्याचा हा प्रकार असल्याची चर्चा आहे. दरम्यान डॉ. थोरात यांच्याशी संपर्क साधला असता, त्यांनी अमेरिकेत असल्याची माहिती मिळाली. डॉ. बाबासाहेब आंबेडकर चरित्र साधने प्रकाशन समितीचे सदस्य सचिव प्रा. प्रदीप आगलावे यांच्याशी संपर्क साधला असता, त्यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या साहित्याचे खंड प्रकाशित होणे महत्वाचे आहे, असे मत व्यक्त केले. तर सदस्यांशी संपर्क साधला असता, अनेकांनी मागील सहाव्या खंडाप्रमाणे या खंडातही चुका आढळून आल्यास सर्वस्वी जबाबदार सदस्य सचिव असतील असे ज्येष्ठ सदस्यांनी मत व्यक्त केले.

**माजी मंत्री डॉ. राऊत यांना फोनवरून निमंत्रण :** डॉ. बाबासाहेब आंबेडकर चरित्र साधने समिती गठित झाल्यानंतर प्रथमच बाबासाहेबांच्या अप्रकाशित साहित्याचा स्वतंत्र खंड प्रकाशित होणार आहे. यामुळे वाचक खंड प्रकाशनाची प्रतीक्षा करीत होते. त्यात सदस्यांना डावलून होणाऱ्या प्रकाशन सोहळ्यामुळे सदस्यांमध्ये तीव्र नाराजीचा सूर आहे. या प्रकाशन समितीमध्ये माजी मंत्री डॉ. नितीन राऊत यांना फोनवरून प्रकाशन सोहळ्याला येण्यासंदर्भात निमंत्रण देण्यात आले, हा एकप्रकारचा अवमान असल्याची भावना व्यक्त होत आहे. साहित्य खंडाच्या प्रकाशनासाठी डॉ. राऊत यांचे मोलाचे योगदान आहे. ज्येष्ठ अर्थतज्ज्ञ डॉ. भालचंद्र मुणगेकर, डॉ. बबन जोगदंड यांच्यासारख्या अर्थविषयक तज्ज्ञांना डावलून समिती कार्यालयात कार्यरत कर्मचाऱ्यांना या कार्यक्रमात सहभागी करून घेण्यात आल्याची जोरदार चर्चा सुरु झाली आहे.

महाराष्ट्र Business Katta










# चला धाब्यावर जाऊ...

आधुनिक केसरी

**भारतीय जनता पार्टीचे प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांनी पत्रकारांशी संबंधित केलेल्या वक्तव्याची ऑडिओ क्लिप चांगलीच गाजते आहे. पत्रकारांनी आपल्या विरोधात कुठलेही वृत्त प्रसिद्ध करू नये याची काळजी घेण्यासाठी पत्रकारांना 'चहा' पाजा, धाब्यावर न्या असे वक्तव्य केले आणि त्याचे पडसाद सर्वत्र उमटायला लागले आहे. देशातला मीडिया आपल्या खिशात ठेवणाऱ्या आणि हवं तेच छापून घेणाऱ्या आणि दाखवायला भाग पाडणाऱ्या पक्षाच्या प्रदेशाध्यक्षांचे हे वक्तव्य त्यांनी का केले असावे..?**




सिद्धेश्वर राना पवार
संपर्क क्र.: 9422880080

धोरण असलेल्या या वृत्तीच्या राजकारण्यांकडून दुसरी अपेक्षा तरी काय केल्या जाणार आहे. महाराष्ट्र हे सुसंस्कृत राज्य. या राज्याची गरिमा वेगळीच. स्व. यशवंतराव चव्हाण यांनी या राज्याची आणि राजकीय संस्कृतीची एक वेगळीच बांधणी केली होती. राज्याचे प्रमुख पद सांभाळत असतांना आचार्य अत्रे यांनी त्यांच्यावर टोकाची आणि वैयक्तिक टीका करत त्यांना निपुत्रिक संबोधले असतांना , यशवंतराव चव्हाण यांनी अत्रेंना घरी बोलावून घेत यशवंतराव चव्हाण यांच्या पत्नी सौ वेणूताई यांना गर्भधारणा का राहू शकली नाही,त्याला कारणीभूत असलेला अपघात याबाबत माहिती दिल्यानंतर अत्रे देखील खजील झाले व आपण अशी टीका करायला नको होती,अशी त्यांची भावना त्यावेळी झाली होती. त्यावेळी सत्ताधारी आणि विरोधक यांच्यातील राजकारण करत असतांना वैयक्तिक संबंध जोपासण्याची व सुख दुःखात सहभागी होण्याची जी संस्कृती होती,त्या संस्कृती ला बावनकुळे च्या विचारसरणीच्या लोकांनी हद्दपार केले आहे. आपल्या मर्जीनुसार न वागणाऱ्या राजकारणातील लोकांना ईडी, इन्कमटॅक्स,सीबीआय चा धाक दाखवून एक तर आमच्या तंबूत दाखल व्हा,अन्यथा तुरुंगात जा अशा पद्धतीने विरोधी पक्ष फोडण्याचे गलिच्छ राजकारण खेळल्या जात आहे.पत्रकारांना ईडी,सीबीआय,इन्कम टॅक्स चा धाक दाखविता येत नसल्याने त्यांच्यावर अशा पद्धतीने पातळी सोडून टीका करत समाजात पत्रकारांची प्रतिमा कशी डागळता येईल याबाबत सुनियोजितपणे असली बदनामीची नीती अवलंबल्या जात आहे.

पत्रकारितेतील सर्वचजण धुतल्या तांदळाचे आहेत असेही नाही.तशा वृत्तीची पत्रकारिता करणारे चिमूटभर असतील ही,मात्र म्हणून सरसगट पत्रकारांच्या बाबतीत असे बेताल वक्तव्य एका देशपातळीवर अस्तित्व असलेल्या पक्षाच्या एका प्रदेशाध्यक्षाने करणे चुकीचेच आहे.त्यांच्या ह्या बेताल वक्तव्याचा त्यांच्या पक्षाने ना निषेध केला,ना ते वक्तव्य चूक असल्याचे आतापर्यंत म्हटले आहे. जोपर्यंत भाजपा आपल्या प्रदेशाध्यक्षाला त्या पदावरून खाली उतरवत नाही अथवा केलेल्या बेताल वक्तव्याची माफी मागत नाही तोपर्यंत पत्रकारांनी आपला लढा सुरूच ठेवावा. कारण म्हातारी मेल्याचे दुःख नसते,काळ सोकावतो.



याचे पत्रकार म्हणून आत्मचिंतन करायला भाग पाडणारे देखील आहे,कारण सर्वच पत्रकार धाब्यावर जाणारे नाहीत किंवा सर्वच जाणारे आहेत असे दोन्हीही बाजूनी म्हणणे धारिष्ट्याचे ठरणारे आहे. मूलतः पत्रकारांना सामोरे न जाणाऱ्या आणि पत्रकारांना सामोरे जाण्याची हिम्मत नसलेल्या नेत्यांचे हे असे बोलणे त्यांच्या वैचारिक पात्रतेचे दारिद्र्य दाखविणारे आहे. पत्रकारितेचा व्यापार करून ठेवलेल्या व्यावसायिक मालकांना हाताशी धरून आपलाच टेम्भा मिरविणाऱ्या आणि तेच

# महात्मा गांधीजींचे विचार आणि आजची तरुण पिढी



डॉ. ज्योती रा. रामोड
संपर्क क्र. 9673774269

आधुनिक केसरी

**"जग बदलायचे असेल तर आधी स्वतःला बदला" असा संदेश येणाऱ्या प्रत्येक पिढीला देणारे आदरणीय महात्मा गांधीजी यांचा जन्म 2 ऑक्टोबर 1869 साली झाला. एखाद्या देशाची संस्कृती ही तेथील रहिवाशांच्या आत्म्यात आणि हृदयात वसलेली असते. त्यामुळे तरुणांनी आपल्या संस्कृतीचा आदर करणे आणि येणाऱ्या पिढीला तो वारसा देणे हे त्यांचे परम कर्तव्य आहे असे गांधीजींचे मत होते. 2 ऑक्टोबर हा दिवस महात्मा गांधी यांच्या जयंतीनिमित्त आंतरराष्ट्रीय अहिंसा दिवस म्हणून साजरा केला जातो. राष्ट्रपिता म्हणजेच राष्ट्राच्या वडिलांची भूमिका आपल्या कर्तव्यातून पार पाडलेली आहे.**

युगाने युगे इतिहासातील प्रत्येक पानांवर सुवर्ण अक्षराने ज्यांचे कार्य नोंदवले गेले असे महान व्यक्तिमत्व म्हणजे आपले बापूजी होय. पण आजच्या जगात वावरत असताना गांधीजींच्या विचारांचा विसर पडत आहे की काय असे तरुण पिढीकडे पाहून वाटत आहे. पुन्हा एकदा सर्वांना गांधीच्या विचारांचे स्मरण व्हावे या उद्देशाने तरुण पिढीला जागृत करण्याचा प्रयत्न !

जागतिकीकरणासह वेगवान आधुनिकीकरणाने गेल्या दशकात आपल्या जीवनशैलीत आणि विशेषतः तरुणांच्या जीवनात आमूलाग्र बदल घडवून आणले आहेत. याशिवाय व्यापक जनसांख्यिकीय बदल, राजकीय अधःपतन, वाढती बेरोजगारी आणि उच्च अर्थव्यवस्था इत्यादींमुळे नवीन पिढीचे जीवन अतिशय गुंतागुंतीचे झाले आहे. आधुनिक भारतातील तरुणांमध्ये गांधीवादी मूल्ये रुजवण्याची गरज आहे, जेणेकरून त्यांना या समस्यांना तोंड देण्यासाठी आणि राष्ट्र उभारणीत अधिक सक्रिय व न्यायप्रिय भूमिका बजावता यावी.

आजची तरुण पिढी असहिष्णुतेचे, अस्वस्थतेचे आणि गैरसमजांचे बळी आहेत, हे घटक मिळून बहुतेकांना हिंसेच्या मार्गाकडे घेऊन जातात. जेव्हा आदर्श जीवनशैली साध्य करण्यासाठी अपेक्षा खूप जास्त असतात परंतु त्यानुसार परिणाम साध्य होत नाहीत तेव्हा ही परिस्थिती अधिक वाईट होते. भौतिकवादामुळे सुखवादी जीवनशैलीला चालना मिळाली आहे. सध्या समाजात भौतिकवादी प्रवृत्ती वाढत आहे, ही प्रवृत्ती लोकांना भौतिक जगात अधिकाधिक गोष्टी शोधण्यास भाग पाडते.

शिक्षण व्यवस्थित होत गेलेल्या बदलांमुळे आजची तरुण पिढी अशा शिक्षण व्यवस्थेचा बळी आहे. ज्यात त्यांना शिक्षणाची खूप संधी आहे पण रोजगाराची उपलब्धता कमी आहे. तथापि, यामुळे समाजात विविध स्तरावर मतभेद निर्माण झाले आहेत. ज्यामुळे तरुणांमध्ये शिक्षण आणि बेरोजगारीच्या बाबतीत व्यापक असमानता निर्माण झाली आहे. रोजगाराच्या संधींचा अभाव ही आपल्या देशातील तरुणांसाठी सर्वात गंभीर चिंता आहे.



सध्याच्या काळात तरुणांसाठी गांधीवादी विचारांचे महत्त्वः असहिष्णुता आणि हिंसेला सामोरे जाणे असहिष्णुता आणि हिंसाचार या एकाच नाण्याच्या दोन बाजू आहेत, महात्मा गांधींनी भारताच्या स्वातंत्र्य लढ्यात सत्य, सत्याग्रह आणि शांतता ही शस्त्रे यशस्वीपणे अंमलात आणली .या आदर्शांनी मार्टिन ल्यूथर किंग जूनियर आणि नेल्सन मंडेला यांच्यासह जगभरातील अनेक महान पुरुषांना प्रेरणा दिली. त्यामुळे भारतातील तरुणांनी महात्मा गांधींच्या विचारांपासून प्रेरणा घेऊन असहिष्णुता आणि हिंसाचाराला शांततेने कसे सामोरे जाऊ शकतात हे शिकले पाहिजे. निःस्वार्थ राष्ट्रवाद आजच्या तरुणांनी देशसेवेसाठी मनापासून वाहून भारताची यशोगाथा लिहिण्यास हातभार लावला पाहिजे. या संदर्भात महात्मा गांधींची टिप्पणी सर्वात योग्य आहे की "स्वतःला शोधण्याचा सर्वोत्तम मार्ग म्हणजे इतरांच्या सेवेत स्वतःला गमावणे." 'वोकल फॉर लोकल' ही संकल्पना डोळ्यासमोर ठेऊन देशातील तरुणांनी कौशल्य आणि नवनिर्मितीच्या माध्यमातून भारताच्या विकासाचा मार्ग मोकळा केला पाहिजे. गांधीजींच्या मते, गरजेपेक्षा जास्त वस्तू जमा करणे ही एक प्रकारची चोरी असेल. अशा स्थितीत समाजात समतोल नियंत्रण ठेवण्यासाठी युवकांना गांधीवादी मूल्यांची पूर्ण जाणीव करून देणे अत्यंत आवश्यक आहे. गांधीजींच्या स्थितप्रज्ञानुसार प्रत्येक व्यक्तीच्या अंगी तपस्वी, वर्ज्य, त्याग, अध्यात्म आणि त्याग यांचा समावेश असावा. अशा प्रकारे स्थितप्रज्ञाचे पालन केल्याने लोकांना भौतिकवाद किंवा सुखवादापासून वेगळे होण्यास मदत होऊ शकते. गांधीवादी शिक्षण : शिक्षण हे मूल्याधारित आणि लोकाभिमुख असावे असे गांधीजींचे मत होते. त्यांनी नेहमीच खऱ्या, राष्ट्रीय शिक्षणाचा पुरस्कार केला. खरे शिक्षण संतुलित बुद्धीचा विकास करते, ज्यामुळे शरीर, मन आणि आत्मा यांचा सुसंवादी विकास होतो. शिक्षणाचे हे गांधीवादी तत्त्व पूर्णपणे विषमता दूर करण्यात मदत करू शकते. स्वावलंबनाचा विकास : सध्याची बेरोजगारीची परिस्थिती पाहता, शिक्षण व्यवस्थेची पुनर्रचना करण्याची गरज आहे आणि त्यासोबतच राष्ट्रीय आणि रोजगाराची मागणी पूर्ण करण्यासाठी देशात मोठ्या प्रमाणावर उद्योजकतेला प्रोत्साहन दिले पाहिजे. या संदर्भात गांधीजींनी तरुणांना व्यावसायिक प्रशिक्षण देण्यावर विशेष भर दिला होता, कारण शिक्षणाशी संबंधित आणि व्यावहारिक अनुभवावर आधारित असे प्रशिक्षण देशातील तरुणांना स्वावलंबी बनवण्यात महत्त्वाची भूमिका बजावू शकते. व्यावसायिक शिक्षणामुळे तरुणांना आवश्यक कौशल्ये उपलब्ध होतील आणि विशेषतः ग्रामीण भागातील बेरोजगारीची समस्या सोडवण्यासाठी उपयुक्त ठरेल. यामुळे पूर्णतः स्वावलंबी भारत निर्माण करण्यात मदत होईल.भारतातील तरुण हे उत्साही आणि गतिमान आहेत आणि योग्य मार्गावर राहिल्यास कोणतेही ध्येय साध्य करण्यास सक्षम आहेत. अशा परिस्थितीत भारतीय तरुणांनी महात्मा गांधींचे हे शब्द नेहमी लक्षात ठेवावेत की "तुमच्या श्रद्धा तुमचे विचार बनतात, तुमचे विचार तुमचे शब्द बनतात, तुमचे शब्द तुमचे कृती बनतात, तुमच्या कृती तुमच्या सवयी बनतात, तुमच्या सवयी तुमचे मूल्य बनतात, तुमचे मूल्य बनतात आणि ही मूल्य तुमचं नशीब बनवतात. संगणक, इंटरनेट, तंत्रज्ञानाची साक्षरता तुम्हास भौतिक समृद्धी देईल. पण तुमचे जीवन स्वास्थ्यसंपन्न व्हायचे असेल तर मूल्यशिक्षण हवेच. नैतिकता,नागरिकशास्त्र,एकात्मता, प्रामाणिकपणा, समूहजीवन,धर्मनिरपेक्षता, जातीअंत, विज्ञाननिष्ठा, स्त्री-पुरुष समानता, लोकशाही स्वातंत्र्य, बंधुता, भ्रष्टाचार विरोध, कर्तव्यदक्षता या गोष्टींचे अध्यापन व संस्कार ही शिक्षणाची खरी ओळख. हीच खरी ओळख गांधीजींच्या प्रत्येक कृतीतून आपल्याला प्रतीत होते. आजच्या तरुण पिढीचे वर्तन आणि विचार यांना गांधीजींच्या तत्त्वज्ञानाची जोड देणे ही काळाची गरज आहे.

# हे संविधानाच्या चौकटीत बसतं का ? : अनिल चव्हाण

आधुनिक केसरी न्यूज

**सुशिल गायकवाड**

**लोणंद :** संविधानाच्या बाबतीत तुम्ही सांगता की,आम्ही संविधानाच्या चौकटीत राहून काम करतो. लोकशाहीच्या मार्गाने करतो.आज संविधानाचा त्यांनी अपमानच केलाय ना...लोकशाहीचा अपमानच केलाय ना..आज १३ ग्रामपंचायतीला ओबीसींचे आरक्षण असताना, ओबीसी समाज असताना ही तुम्ही त्याचा गळा घोटण्याचं कामच केलं ना,तुम्ही दुसऱ्या लोकांना देऊ शकला का?आज तुमचाच सरपंच,तुमचाच उपसरपंच, तुमचाच कॉन्ट्रॅक्टर ही लोकशाही आहे का? हे संविधानाच्या चौकटीत बसतं का? असा सवाल निरा-शिवतक्रार ग्रामपंचायतीचे सदस्य अनिल चव्हाण यांनी सत्ताधाऱ्यांवर टीका करत उपस्थित केला आहे. सत्ताधारी निरा विकास आघाडीचा कारभार हा संविधानाच्या चौकटीतूनच चालला असल्याचे म्हटले गेले होते.परंतु यांच्याकडून संविधानाचा अपमान होईल असा कारभार सुरू असल्याचा आरोप विरोध गटातील ग्रामपंचायतीचे सदस्य अनिल चव्हाण यांनी निरा ता.पुरंदर येथे आयोजित करण्यात आलेल्या पत्रकार परिषदेतून केला.



यावेळी ग्रामपंचायतीचे सदस्य प्रमोद काकडे, रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (ए) चे पुणे जिल्हा युवक उपाध्यक्ष अमोल साबळे,आम आदमी पार्टीचे पुरंदर तालुका युवा अध्यक्ष महेश जेधे,सामाजिक कार्यकर्ते सचिन मोरे,सामाजिक कार्यकर्ते महेश धायगुडे, डीबीएनचे अशोक मोरे आदी उपस्थित होते. पुढे अनिल चव्हाण म्हणाले की,जर तुम्ही पारदर्शक काम करता,ऑनलाइन टेंडर ची ही पारदर्शकता यावी म्हणून शासनानं आखलं.तुम्ही सर्व मॅनेज करून देताय लोकांना,ठेवा ना मीटिंग मध्ये आणि ऑनलाइन भरू द्या कुठलाही माणूस, कुठलाही कॉन्ट्रॅक्टर,एखादा असेंल कुणी ही भरु शकेल.परंतु कॉँट्रॅक्टर ह्यांचाच असतो.हीच का ती कारभाराची पारदर्शकता ? असा सवाल सुद्धा त्यांनी उपस्थित केला. संविधानाची चौकट मजबूत होण्यासाठी विरोधक म्हणून आम्ही चुकीचं काम करणाऱ्यांना त्यांची जागा दाखवू असे अनिल चव्हाण यांनी म्हटले. बाबासाहेब आंबेडकरांनी जे संविधान लिहिलं.त्या संविधानामध्ये सगळ्याना लोकशाही मार्गाने, प्रत्येकाला अधिकार दिले. आपापल्या अधिकाराचा वापर आपण चांगल्यासाठी वापर केला पाहिजे.आपण उगाचच लोकशाहीचा गळा घोटून काम करणं हे चुकीचं आहे.सर्व बहुजन लोकांना विनंती आहे की आपल्या हक्कासाठी आपण सर्वांनी भांडलं पाहिजे.आपला तो अधिकार आहे आणि जो कुणी चुकीचं काम करत असेल तर त्याला त्याची जागा दाखविली पाहिजे, असे अनिल चव्हाण यांनी म्हटले. यावेळी ग्रामपंचायतीचे सदस्य प्रमोद काकडे, रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (ए) चे पुणे जिल्हा युवक उपाध्यक्ष अमोल साबळे,आम आदमी पार्टीचे पुरंदर तालुका युवा अध्यक्ष महेश जेधे,सामाजिक कार्यकर्ते सचिन मोरे यांनी सुध्दा आक्रमक भूमिका घेत सत्ताधाऱ्यांच्या कारभारावर टीकास्त्र सोडले.

# टुडो यांचा आडमुठेपणा : कॅनडाला फटका



डॉ. वि. ल. धारुरकर
संपर्क क्र. 9225313592

आधुनिक केसरी

**कॅनडाचे पंतप्रधान जस्टीन टुडो यांनी शिख अतिरेक्यांची बाजू घेऊन भारतीय राजदुताला माघारी पाठविले. खरे तर कॅनडाने शिख अतिरेक्यांना पाठिशी घालूनये अशी भारताने कॅनडाला वारंवार समज दिली होती परंतु कॅनडाने ऐकले नाही, एक मित्र राष्ट्र म्हणून भारताच्या आखडत्व व सार्वभौमत्त्वाचा आदर करण्या ऐवजी कॅनडाने पुन्हा पुन्हा शिख दहशदवाद्यांना पाठीशी घातले. आणि वारंवार भारत विरोधी भूमिका घेतली.त्याचा सर्वाधिक फटका कोणाला बसणार असेल तर तो कॅनडाला बसणार आहे.शिक्षण पर्यटन आणि व्यापार अशा तीन क्षेत्रात कॅनडाचे मोठे नुकसान होण्याची शक्यता आहे. कोरोना महामारी यानी युक्रेन युद्धात अर्थिक संकटात सापडलेल्या कॅनडा पुढे अडचणीत मोठी भर पडणार आहे, या तणावाचा कॅनडाच्या अर्थ कारणावर कसा परिणाम होईल हे या लेखात मांडले आहे.**

कॅनडा हा उत्तर अमेरिका खंडामध्ये वसलेला देश असून एकूण 10 प्रांत आणि 3 प्रादेशिक विभागाने युक्त आहे.कॅनडाच्या पूर्वेस अटलांटिक महासागर, पश्विमेस प्रशांत महासागर आणि उत्तरेस आर्किटिक महासागर आहे.त्यांचे क्षेत्रफळ 99.8 चौरस लाख कि.मी.एवढा भू प्रदेश असलेला जगातील हा दुसरा मोठा देश आहे.खनीज संपत्ती, वन संपत्ती आणि पोटॅशिअमच्या उपलब्धतेमुळे हा देश संपन्न आहे. जागतिक पर्यटानाचे ही ते एक महत्त्वाचे क्षेत्र आहे. 2020-21 च्या जनगणनेनुसार कॅनडाची लोकसंख्या 3 कोटी 70 लाख होती, त्यापेकी 16 लाख म्हणजे सुमारे 4 टक्के भारतीय वंशाचे नागरिक आहेत. त्यापैकी 7 लाख 70 हजार नागरिक शिख आहेत. मागील 20 वर्षात शिखांची संख्या दुप्पट झाली आहे त्यामुळे कॅनडा शिख दहशवादाचे केंद्र बनत आहे.

भारताने बांग्लादेश मुक्तीला पाठिंबा दिल्यामुळे पाकिस्तान भारताविरूद्ध दहशतवादाचे भूत नाचवित आहेत. कमालीची आर्थिक विषमता आणि सामाजिक असमतोलामुळे वंग बंधु शेख मुजिबूर रेहमान यांनी बांग्लादेश मुक्तीचा संग्राम केला. कारण पाकिस्तान बांग्लादेशचे आर्थिक शोषण करत असे.भाराताच्या पोलादी महिला माजी पंतप्रधान इंदिरा गाधी यांच्या काळात 1971 रोजी बांग्लादेश मुक्त झाला.त्याचा बदला घेण्याचा दुष्ट डाव पाक लष्करशहा जिया ऊल हक आणि फरवेद मुशर्रफ यांच्या काळात शिख दहशतवादाला खत पाणी घालण्यात आले. सध्या पंजाब मध्ये प्रत्यक्षात या खलिस्तानच्या मागणीला काहीही पाठीबा नाही, त्यामुळे दहशतवाद्यांनी कॅनडा मध्ये आश्रस घेतला व तेथून कारवायांना सुरवात केली.

**पाकचे दुष्ट राजकारण :** चौराच्या उलट्या बोंबा या न्यायाने पाकिस्तान कॅनडाची बाजू घेऊन कोल्हेकोई करत आहे.त्यामुळे कॅनडाची आवस्था "ना घर का ना घाट का'' अशी झाली आहे. तेथील भारत विरोधी कायवाया चिंताजनक आहेत. काही महिण्यापूर्वी कॅनडा मध्ये इंदिरा गांधीच्या प्रतिमेची विठंबना करण्यात आली, तसेच इंग्लंड कॅनडामध्ये भारतीय राष्ट्रध्वजाचा अपमान करण्यात आला. त्यानंतर कॅनडामध्ये तीन शिख दहशतवाद्यांची करण्यात आली ही हत्या या गटातील अंतर्गत स्पर्धा व परस्पर द्वेषामूळे झाली असावी, परंतु कॅनडाचे पंतप्रधान जस्टीन टुडो यांनी भारताकडे बोट दाखवून शंका घेतील, त्यांच्या कृतीला भारतानेही चोख प्रत्युत्तर उत्तर दिले.

**फटका कॅनडाला :** शिक्षण, पर्यटन आणि व्यापर या तीन महत्त्वाच्या क्षेत्रात भारताशी पंगा घेतल्यामुळे कॅनडाच्या अर्थव्यवस्थेला मोठा फटका बसणार आहे.भारतामुळे कॅनडाच्या अर्थव्यवस्थेला फार मोठी मदत होत असते.एका दहशतवादाच्या हत्तेचे



भांडवल करणे टुडो यांना महागात पडू शकते. जर भारताने ठाम भूमिका घेतील तर कॅनडाला 4.9 अब्ज डॉलरचा फटका एकट्या शिक्षण क्षेत्रात बसू शकतो. तसेच भारत व कॅनडा दरम्यान मुक्त व्यापाराचा करार दृष्टीपथात असतांना हे वादळ कॅनडाला आर्थिक आघाडीवर लगाम घालण्यासाठी कारणीभूत ठरू शकते, कारण भारत व कॅनडा दरम्यान आयात निर्यात समतोल आहे आणि उभय देशातील व्यापार दुप्पट होण्याची शक्यता आहे. कॅनडाने केलेल्या अंगुली निर्देशामुळे आपण काही मोठी मुर्दूंमकी केली असे, टुडो यांना वाटत होते, परंतु इंग्लंड अमेरिकेसह जगातील पाच लोकशाही राष्ट्रांनी अप्रत्यक्ष भारताची बाजू घेतली आहे. त्यामुळे टुडो यांचा सूर आणि नूर पालटला आहे व ते काहीसे नरमले आहेत. खरे तर कॅनडाने कोणतेही पुरावे न देता हरदिपसिंह निज्जर याच्या हत्ते प्रकरणी केलेले आरोप म्हणजे शुद्ध धुळ फेक आहे. जागतिक समुदायाने भारताची भूमिका घेतली आहे आणि कॅनडा एकाकी पडत आहे.कॅनडाला आपल्या निर्णयामुळे कोणते परिणाम होतील याबाबत गांभिर्य नाही. टुडो यांनी आडमुठे पणा केला कॅनडाला भेट देणाऱ्या भारतीय पर्यटकांच्या संख्येत घट होऊ लागेल शिवाय उद्योग व व्यापार क्षेत्रात कॅनडाचे मोठे नुकसान होईल. आपली आर्थव्यवस्था सुद्रढ आहे हा कॅनडाचा गैरसमज आहे.

**पुस्का दावा :** कॅनडाचे पंतप्रधान जस्टीन टुडो यांनी पुन्हा एकदा फुस्का दावा करून आपली पत कमी केली आहे.त्यांनी कोणतीही पाऊले टाकण्यापूर्वी जागतिक राजकारणाची परिस्थिती पाहिली पाहिजे.कॅनडा मधील हिंदू समुदाया हा शिखांपेक्षा मोठा आहे त्यांना दुखावून कोणताही निर्णय घेणे बादित ठरू शकते.तसेच कॅनडा ही एक शिक्षणाची मोठी बाजारपेठ आहे.तेथे शिकणाऱ्या भारतीय विद्यार्थ्यांचे प्रमाण वाढत आहे, कारण तेथून विद्यार्थ्यांना अमेरिकेत जाऊन पढील शिक्षण घेणे सोपे जाते. कॅनडात उच्च शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या मोठी आहे व वाढत आहे, अशा वेळी भारताशी वितुष्ट घेतल्यास भारतीय विद्यार्थ्यांकडून त्यांना होणारा सर्वाधिक फायदा बंद पडू शकतो. भारताने जर आपल्या विद्यार्थ्यांना मायदेशी बोलाविले तर कॅनडाची अर्थ व्यवस्था तंगू होऊ शकते. भारतामधील असख्यं विद्यार्थी मोठे शैक्षणिक शुल्क् भरून कॅनडामध्ये शिक्षण घेतात, आणि तेथील अर्थव्यवस्थेस मोठी बळकटी देतात. भारतीय विद्यार्थ्यांकडून 4-5 पट अधिक शुल्क आकारण्यात येते. भारताने विद्यार्थ्यांना माघारी बोलवण्याचा निर्णय घेतल्यास कॅनडाचे दर वर्षी 4.9 अब्ज् डॉलरचे नुकसान होईल त्यामुळे कॅनडाने हा वाद चिगळता कामा नये अशी काळजी घेतली पाहिजे. शिवाय भारतीय नागरिकांचे कॅनडाच्या आर्थिक विकासात मोठे योगदान आहे. कॅनाडामध्ये 8 लाख विद्यार्थी बाहेरच्या देशातील शिकतात, त्यामध्ये 40 टक्के विद्यार्थ्यांची संख्या भारतीय विद्यार्थ्यांची आहे.कॅनडामध्ये अनेक खाजगी विद्यापीठे भरतीय विद्यार्थ्यांच्या भरवश्यावर चालतात जर विद्यार्थी परत गेले तर तेथील विद्यापीठाच्या तोंडाला फेस येऊ शकतो. शिवाय भारत कॅनडा दरम्यानचा व्यापार पाहता भारतापेक्षा कॅनडाचे नुकसान अधिक होणार आहे. कारण विमानाच्या सुट्या भागापासून ते किरकोळ बाजारपेठेतील वस्तुमध्ये कॅनडा भारतावर अंवलंबून आहे.या सर्व परिस्थितून बाहेर पडण्यासाठी कॅनडाला शहाणपण सुचेल काय?आणि या वादातून बाहेर पडून कॅनडाला शहाणपचा मार्ग सुचेल काय?तसे झाले नाही तर बूडत्याचा पाय खोलात या म्हणी प्रमाणे कॅनडा निराशेच्या गर्तेत फेकला जाऊ शकतो.त्यामुळे मागचे पाडे 55 असे न करता टुडो यांनी डोके शांत ठेवून आपल्या पायाखालची वाळू घसरत आहे हे विसतरता कामा नये.

**हा हस्तक्षेप वर्ज्य :** संयुक्त राष्ट्रसंघाच्या सनदेनुसार कोणत्याही राष्ट्राने दुसऱ्या देशाच्या सार्वभौमत्वामध्ये हस्तक्षेप करता कामा नये, परंतु कॅनडा शिख दहशतवाद्यांना पाठीशी घालत आहे त्यातून अनेक प्रश्न उभे राहत आहेत. खरे तर कॅनडा हा देश दहशतवादासाठी स्वर्ग बनत आहे. आणि त्यांच्या बेकादेशिर निधी संकलनात नकळत सहाय्य करत आहे हे दशहतवादी जगातील अनेक देशात वेगवेगळ्या ठिकाणी गुंतवणूक करत आहेत.

**नवा चक्रव्युह :** पाकिस्तान प्रमाणे कॅनडा हा दहशतवादाचे समर्थन करणार देश म्हणून बदनाम होत आहे. भारताची व्यवस्था लोकशाही दृष्टीने संविधानावर आधारलेली आहे.भारताने कायद्याचे राज्य आणि मानवी हक्कांचे नेहमी पालन केले आहे. परंतु कॅनडाने भारताच्या अंतर्गत प्रश्नांमध्ये हस्तक्षेप करून ज्या पद्धतीने दहशतवादी प्रत्याचे समर्पन केले आहे, हा टुडो यांचा आडमुठे पणा होय. कॅनडामधील दहशवादी कृत्य एवढ्या टोकाला गेली की राष्ट्रपिता महात्मा गांधी यांच्या पुतळ्याची विटंबना केली. कॅनडातील तथा कथित मुठभर खलीस्तानवाद्यांचा हा नवा चक्रव्युह भारताला संकटात टाकणारा आणि तेवढाच मानसिक दृष्टीने संतापजनक आहे.पंतप्रधान नरेद्र भाई मोदी यांनी या प्रश्नावर ठाम भूमिका घेऊन टुडो यांना त्यांची जागा दाखवून दिली आाहे.

कॅनडाने आपला पवित्रा बदलला पाहिजे विविध आघाड्यावर होणारे नुकसान टाळण्यासाठी समजुतदार पणाची भूमिका घेतली पाहिजे आणि दहशतवादाचे समर्थन करता कामा नये. परराष्ट्र मंत्री एस.जय शंकर यांनी संयुक्त राष्ट्रसंघात केलेल्या भाषणात दहशतवाद्याचा निशेध केला आहे आणि लोकशाही मुल्ये जतन करण्याची विनंती केली आहे.हे लक्षात घेता एक लोकशाही राष्ट्र म्हणून कॅनडाने समजूतदार पणा दाखविला पाहिजे कारण या आडमुठेपणामुळे कॅनडाचे मोठे नुकसान होणार आहे.

**समारोप :** या सर्व चर्चेवरून असे स्पष्ट की, कॅनडाची अर्थव्यवस्था जगातील इतर राष्ट्राप्रमाणे भारतावरही अवलंबून आहे. प्रामुख्याने शिक्षण पर्यटन व्यापार उद्योग या सर्व क्षेत्रात कॅनडा भारतावर अवलंबून आहे आपले आर्थिक नुकसान टाळावयाचे असेल तर पंतप्रधान जस्टीने टुडो यांनी कोणाच्याही दबावाखाली न येतो स्वतंत्र व न्याय भूमिका घेतली पाहिजे त्यामुळे त्यांचे मोठे अर्थिक नुकान होणार आहे. दुसऱ्याकडे बोट दाखविण्याऐवजी त्यांनी आपल्या पायाखाली काय गळत आहे हे पहावे.2023 मध्ये कोणत्याही विकसनशिल राष्ट्राला भारताशी पंगा घेणे महागात पडू शकते हे कॅनडाने विसरता कामा नये.शांतता व परस्परांचा आदर हाच खरा प्रगतीचा मार्ग होय हे कॅनडाने ओळखावे तोच खरा संदेश आहे.



# ...आणि चित्रपटसृष्टीला प्रतिभावंत अभिनेता गवसला

आधुनिक केसरी

**नशिबाचे खेळच वेगळे असतात. माणसाला बनायचे काही असते आणि नशीब त्याला काही वेगळेच बनविते. एकापेक्षा एक सरस भूमिका करणारे आपल्या चित्रपटसृष्टीतील असेच एक प्रसिद्ध कलावंत ! त्यांना गायनाची अतिशय आवड होती आणि कुंदन लाल सहगल यांच्यासारखा गायक बनण्याचे स्वप्न त्यांनी उराशी बाळगले होते. मात्र ते गायक न बनता चित्रपट अभिनेते बनले. या प्रख्यात कलावंताचे नाव आहे सय्यदना इफ्तेखार अहमद शरीफ ऊर्फ इफ्तेखार ! विविध भूमिका करणाऱ्या इफ्तेखार यांनी एकदा एका चित्रपटात पोलिस अधिकाऱ्याची भूमिका काय केली आणि त्यांच्यावर `पोलिसवाला' हाच शिक्का बसला. आणि मग त्यांना पोलिस निरीक्षक, पोलिस उपआयुक्त, पोलिस आयुक्त आणि पोलिस महानिरीक्षक याच भूमिका वारंवार कराव्या लागल्या.**

इफ्तेखार यांचा जन्म २२ फेब्रुवारी, १९२० या दिवशी पंजाबमधील जलंधर शहरात झाला. त्यांचे पिता कानपूरमधील एका कंपनीत काम करीत असल्यामुळे त्यांचे बालपण कानपूरमधे गेले. मॅट्रिक झाल्यावर त्यांनी `लखनौ कॉलेज ऑफ आर्टस'मधून चित्रकलेची पदविका संपादन केली. इफ्तेखार यांना गायनाची अतिशय आवड होती म्हणून लखनौच्या आता `भातखंडे म्युझिक अकॅडमी` म्हणून ओळखल्या जाणाऱ्या त्या काळातील `मॅरिस म्युझिक कॉलेज'मधे त्यांनी संगीताचे शिक्षण घेतले. कुंदन लाल सहगल यांच्यासारखेच गाणाऱ्या इफ्तेखार यांचे सहगल यांच्यासारखेच प्रसिद्ध गायक होण्याचे स्वप्न होते. ते उराशी बाळगूनच वयाच्या अवघ्या विसाव्या वर्षी ते कोलकत्याला आले. आल्यावर ते `एचएमव्ही' कंपनीत आवाजाची चाचणी देण्यासाठी गेले. संगीतकार कमल दासगुप्ता यांनी त्यांची चाचणी घेतली. कमल दासगुप्ता यांनी १९४२ साली `आयएमपी प्रॉडक्शन`च्या `जवाब' या चित्रपटाला संगीत दिले होते. इफ्तेखार यांचे नशीब बलवत्तर होते. ते चाचणीत उत्तीर्ण झाले आणि `एचएमव्ही'ने



त्यांनी गायिलेल्या दोन गीतांचा खासगी अल्बम प्रसिद्ध केला. त्यानंतर इफ्तेखार कानपूरला परतले. काही काळानंतर त्यांना कोलकत्याच्या `एमपी प्रॉडक्शन कंपनीच्या वतीने अभिनेता म्हणून नोकरी देऊ करण्यात आली. कंपनीचे पत्र त्यांच्या हातात पडले तेव्हा कानपूरच्या मुलीशी त्यांचा विवाह ठरला होता. परंतु कोलकत्याला जाऊन चित्रपटात मिळणारे काम आधी पदरात पडून घे असा सल्ला त्यांच्या मित्रांनी त्यांना दिला आणि त्यांनी तो शिरोधार्य मानला. कोलकत्यात नोकरी करीत असताना त्यांच्याच इमारतीत राहणाऱ्या हन्ना जोजफ नावाच्या तरुणीवर त्यांचे प्रेम बसले. कानपूरमधील मुलीशी ठरलेला विवाह इफ्तेखार यांनी रद्द केला आणि ते हन्नाशी विवाहबद्ध झाले. हन्नाने विवाहानंतर रेहाना अहमद असे आपले नामकरण केले. १९४४ साली इफ्तेखार नायक असलेला `तकरार' हा पहिला चित्रपट प्रदर्शित झाला. त्यात जमुना त्यांची नायिका होती. १९४५ मधे `घर' आणि `राजलक्ष्मी' हे दोन चित्रपट प्रदर्शित झाले. त्यात अनुक्रमे जमुना आणि कानन देवी त्यांच्या नायिका होत्या. १९४७ साली देशाची फाळणी झाल्यावर इफ्तेखार यांचे कुटुंबीय आणि नातलग भारत सोडून पाकिस्तानात गेले; पण इफ्तेखार भारतातच राहिले. मात्र हिंसाचार सुरू झाल्याने ते कोलकता सोडून मुंबईला आले. मुंबईत पुन्हा एकदा कामाचा शोध सुरू झाला. त्याचवेळी `बॉम्बे टॉकीज`मधे त्यांची अभिनेते अशोक कुमार यांच्याशी भेट झाली. कोलकत्यात कानन देवी यांनी इफ्तेखार यांचा अशोक कुमार



यांच्याशी परिचय करून दिला होता आणि अशोक कुमार ती भेट विसरले नव्हते. म्हणून अशोक कुमार यांनी १९५० साली प्रदर्शित झालेल्या `मुकद्दर' या चित्रपटात इफ्तेखार यांना एक महत्त्वपूर्ण भूमिका द्यावयास लावली आणि त्यांचा चित्रपटप्रवास सुरू झाला. त्यानंतर `बिराज बहू', `मिर्जा गालिब', देवदास', `बंदिनी' या चित्रपटांसह इतरही काही चित्रपटांमधे त्यांनी लहान-मोठ्या भूमिका केल्या. पण त्यांना खरी ओळख १९६९ साली प्रदर्शित झालेल्या `बी. आर. फिल्म्स'च्या `इत्तिफाक' या चित्रपटामुळे मिळाली. या चित्रपटात त्यांनी केलेली पोलिस निरीक्षकाची व्यक्तिरेखा प्रेक्षकांच्या पसंतीस उतरली. पण त्यानंतर पोलिस निरीक्षक, पोलिस उपआयुक्त, पोलिस आयुक्त आणि पोलिस महानिरीक्षक या भूमिकाच त्यांना वारंवार कराव्या लागल्या. १९७० ते १०८० या दहा वर्षांमधे इफ्तेखार यांना घवघवीत यश मिळाले.

या काळात त्यांनी `मेहबूब की मेहंदी', `शर्मिली', `हरे रामा हरे कृष्णा', `गॅम्बलर`, `जंजीर', `दीवार', `शोले', `कभी कभी', `नूरी', `त्रिशूल' या सारख्या आर्थिकदृष्ट्या यशस्वी झालेल्या चित्रपटांमधे भूमिका केल्या. आपल्या ५० वर्षांच्या अभिनयाच्या कारकिर्दीत त्यांनी सुमारे ३०० चित्रपटांमधे काम केले. १९९३ साली प्रदर्शित झालेला `काला कोट' हा त्यांचा अखेरचा चित्रपट ठरला. त्यांचा जीवनक्रम सुखाने सुरू असताना ७ फेब्रुवारी, १९९५ या दिवशी त्यांच्या धाकट्या कन्येचे अचानक निधन झाले आणि याचा त्यांना मोठा मानसिक धक्का बसला. अचानकपणे त्यांच्या रक्तातील साखरेचे प्रमाण वाढले. सगळ्या प्रकारचे उपचार करूनही त्यांच्या प्रकृतीत सुधारणा झाली नाही. आपल्या कन्येच्या निधनानंतर पंचवीस दिवसांनी म्हणजे ४ मार्च, १९९५ या दिवशी मुंबईत या अभिजात अभिनेत्याचे निधन झाले.

अनिल रा. तोरणे
तळेगाव दाभाडे, पुणे
९२२६१६०६५४

# पवार कुटुंबाची वर्गवारी करण्याइतपत आम्ही मोठे नाही : दत्ताआबा चव्हाण

## शरद पवार हे मूळ : म्हणून आम्ही साहेबांसोबत

आधुनिक केसरी न्यूज



**सुशिल गायकवाड**

**लोणंद :** शरद पवारांचे कामकाज पाहता.त्यांचं वडीलकीचं नातं पाहता, मूळ बीज पाहता, त्यांच्या बरोबर राहायचं ठामपणे ठरवलेलं आहे. ह्याचा अर्थ इतर पक्षातील आणखी, दादा नाही तर इतर कुणी असतील त्यांना आमचा विरोध नाही. त्यांना आम्हांला विरोध करायचा नाही. नाराजही करायचं नाही. दादांनी वेगवेगळ्या प्रसंगाला,वेगवेगळ्या कामाच्या वेळेस त्यांनी सुद्धा मदतीच केलेल्या आहेत. त्या कुटूंबाची वर्गवारी करण्याइतपत आम्ही मोठे नाहीत. आम्ही स्वतःला त्यांचे पाईकच समजतो. त्यामुळे ते कोण छोटं आणि मोठं म्हणणार नाही. फक्त मूळ बीज म्हणून आम्ही साहेबांच्या बरोबर राहायचं आमच्या कुटुंबांनं ठरविले आहे, असे प्रतिपादन पुणे जिल्हा परिषदेचे माजी आरोग्य बांधकाम सभापती दत्ताआबा चव्हाण यांनी केले.

ते निरा, ता.पुरंदर येथे राष्ट्रवादी काँग्रेसच्या (शरद पवार गट) पुणे जिल्ह्याच्या सरचिटणीस पदी निवड झाल्याबद्दल त्यांचा सत्कार करण्यात आला होता. तेव्हा त्यांनी ही प्रतिक्रिया दिली. त्यांचा सत्कार करताना ग्रामपंचायत सदस्य सुनील चव्हाण, अमोल साबळे, सुभाष जेधे, अशोक मोरे, जगन्नाथ भोसले व इतर उपस्थित होते.या निवडीबद्दल दत्ताआबा चव्हाण यांनी आपल्या भावना व्यक्त करत असताना पवार कुटूंबाबद्दल विशेष आदर व्यक्त केला. दत्ताआबा चव्हाण म्हणाले की,चव्हाण कुटूंबीयांचा जन्म हा पवार कुटूंबीयांशी जवळीक म्हणून सगळ्या परिसराला, तालुका, जिल्ह्याला, महाराष्ट्राला माहीत आहे. शरद पवार हे मुळ बीज आहे. त्यांचे मतभेद हे त्यांच्याशी, एकमेकांशी असतील, आमचे कोणाशीही मतभेद नाहीत. उद्या भविष्यात त्यांनी सगळ्यांनी एकत्र यावे हीच अपेक्षा आम्ही करतो आहे.पण आता साहेबांना दुखावण्याची आमची मानसिकता नाही. त्यांच्या पासून लांब जाण्याची मनस्थिती नाही.या विभागाच्या खासदार सुप्रियाताई सुळे या परिसरात जास्तीत जास्त सर्वसामान्य माणसापासून ते गांव आणि परिसराचा विकास करण्याच्या दृष्टीकोनातून त्यांचे कामकाज आहे. या मतदारसंघात जास्तीत जास्त काम, चांगले विचार सामान्य माणसांपर्यंत पोहचविण्याचं काम निश्चितपणे हाती करण्याचं घेतलेलं आहे.असेही दत्ताआबा चव्हाण यांनी म्हटले.शरद पवार यांचा विचार सगळ्याच जाती धर्माला बरोबर घेऊन जाणारा आहे. या जगात मानवता हा धर्म जो गौतम बुद्धांनी मांडला. तोच विचार आमच्या सारखा सामन्य माणूस मांडतो आहे. तोच विचार घेऊन आम्ही सामान्य माणसापर्यंत घेऊन त्यांच्या सुख दुःखात सामील होण्याच्या दृष्टिकोनातून जायचं ठरवलं आहे. सर्वसामान्य लोकांच्या दृष्टीने काम करण्याचा विश्वास हा दत्ताआबा चव्हाण यांनी व्यक्त केला.



# स्व. पुष्पादेवी पाटील महाविद्यालयात म.गांधी, लालबहादूर शास्त्री जयंती

आधुनिक केसरी न्यूज

**रिसोड :** राष्ट्रपिता महात्मा गांधी आणि लालबहादूर शास्त्री यांची जयंती स्थानिक स्व. पुष्पादेवी पाटील महाविद्यालयात मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली. दोघांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. यानिमित्त विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. अखिल मानव जातीच्या आरोग्यासाठी महात्मा गांधीजींनी दिलेल्या स्वच्छतेच्या संदेशाची व्यापक प्रमाणात जनजागृती व्हावी, या उद्देशाने प्राचार्य यांच्या मार्गदर्शनात कॉलेज मधे राष्ट्रीय सेवा योजना व सांस्कृतीक विभागाच्या वतीने स्वच्छता मोहीम राबविण्यात आली.

सदर मोहिमेत प्राध्यापक,प्राध्यापिका, शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थ्यांनी स्वयंस्फूर्तीने सहभाग घेतला होता. येथील स्व. पुष्पादेवी पाटील महाविद्यालयात प्राचार्य डॉ.एम.एन. गायकवाड यांच्या मार्गदर्शनाखाली राष्ट्रीय सेवा योजना व सांस्कृतिक विभागाच्या वतीने महात्मा गांधी व लालबहादूर शास्त्री जयंती साजरी करण्यात आली.या दोन थोर विभूतींच्या प्रतिमांच्या पूजनानंतर बोलताना डॉ.आदिनाथ बदर यांनी लालबहादूर शास्त्री यांचे कार्यकर्तृत्व देशाला मोठे योगदान देणारे असून, राष्ट्रपिता महात्मा गांधी यांनी जगाला सत्य, अहिंसा, शांतीचा संदेश स्वतःच्या कृतीतून दिला असे मत व्यक्त केले.

कार्यक्रमाच्या प्रास्तविकेतून प्रा. केशव कोकाटे,राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रमाधिकारी यांनी भारतासारख्या वैविध्यपूर्ण राष्ट्रामध्ये स्वातंत्र्याच्या समर्थनार्थ राष्ट्रातील विविध लोकांना एकत्रित आणून राष्ट्राला गुलामगिरीच्या जोखडातून मुक्त करण्याचे काम महात्मा गांधीजींनी केले.

तद्वतच माजी पंतप्रधान लालबहादूर शास्त्री यांनी देशाचे रक्षण करणारे जवान आणि अन्नधान्य पुरविणारा शेतकरी यांच्यावर विशेष लक्ष देऊन राष्ट्राला सक्षम बनवले असे मत व्यक्त केले. सूत्रसंचालन सांस्कृतिक विभाग प्रमुख डॉ. छाया खिल्लारे, आभार प्रदर्शन डॉ.सिद्धार्थ इंगोले यांनी केले. कार्यक्रमाच्या आयोजनात डॉ. आम्रपाली भगत,डॉ. अमोल अढाव,यांचा सहभाग होता. सदर कार्यक्रम प्रसंगी महाविद्यालयातील संपूर्ण प्राध्यापक, प्राध्यापिका व शिक्षकेतर कर्मचारी वृंद उपस्थित होते.

# मोलखेडा येथील जिल्हा परिषद शाळेला गांधी जयंतीचा पडला विसर



आधुनिक केसरी न्यूज

**सोयगाव :** तालुक्यातील मोलखेडा येथील सोयगाव तालुका मुख्यालयापासून ६० किमी अंतरावर असलेल्या जिल्हा परिषद शाळा २ ऑक्टोबर रोजी सोमवारला महात्मा गांधी जयंतीचा जिल्हा परिषद कडून जिआर येल असून शुद्धा मुख्याध्यापक अवधूत सर यांना विसर पडला.

मोलखेडा सरपंचपती ज्ञानेश्वर वारंगणे,शालेय समितीचे अध्यक्ष राजू सुपडा वारांगणे व नागरिक उपस्थित मात्र शिक्षकवृंद पदाधिकारी गायब असल्याचे दिसून आले जिल्हा परिषद शाळेला २ ऑक्टोबर रोजी सोमवारला महात्मा गांधी जयंतीचा विसर पडला. देशाला स्वातंत्र्य मिळवून देण्यात महात्मा गांधी यांनी आपले आयुष्य घालविले. ते सदैव स्मरणात राहावे तसेच त्यांचे विचार व कृती प्रत्यक्षात उतरावी यासाठी दरवर्षी २ ऑक्टोबर सोमवार रोजी प्रत्येक शासकीय, निमशासकीय कार्यालय, ग्रामपंचायत, शाळा, नगर पंचायत कार्यालयामध्ये गांधी जयंती साजरी करणे आवश्यक आहे. गांधी जयंतीचे औचित्य साधून विशेष सभा घेणे, स्वच्छता अभियान राबविणे आवश्यक आहे. मात्र जिल्हा परिषद शाळेला मोलखेडाच्या शिक्षकांना,गांधी जयंतीचा विसर पडला. काही ग्रामस्थांनी दिलेल्या माहिती नुसार गावच्या सरपंच मनीषाताई ज्ञानेश्वर वारंगणे व शाळेय समितीचे अध्यक्ष राजू सुपडा वारांगणे हे सकाळीच दहा वाजता जिल्हा परिषद शाळेत आले. त्यानंतर दिड तास थांबून त्याही परतल्या शाळेत ११:३० पर्यंत कोणी दिसून आले नाही. स्वच्छता अभियान आणि गांधी जयंतीसाठी काही महिला, पुरुष, गावकरी तसेच महिला बचत गटाच्या सदस्या जिल्हा परिषद शाळेत आल्या. मात्र कोणीच नाही, कार्यक्रम कसा घ्यायचा, असे उत्तर कोणीच द्यायला उपस्थित नव्हते रविवारी मुख्याध्यापक, शिक्षकवृंद हजर नव्हते, अशी माहितीही ग्रामस्थांनी दिली.विशेष म्हणजे आजच्या दिवशी महात्मा गांधी यांच्या प्रतिमेला प्रत्येक ठिकाणी पूजल्या जाते मात्र जिल्हा परिषद शाळेत मध्ये महात्मा गांधी यांचा फोटो भिंतीवरच लटकलेला होता. महात्मा गांधी जयंती कार्यक्रमासाठी थोडाही वेळ दिला नाही. नोटीसमध्ये कार्यक्रमाची वेळ सकाळी १० वाजताची ठरविली होती. गोकुळसिंग राजपूत शाळेला स्वतः भेट दिली.



# स्वच्छता सर्वत्रच ठेवीन असंच ध्येय ठेवा: माजी उपमहापौर प्रमोद राठोड

आधुनिक केसरी न्यूज

**छत्रपती संभाजीनगर :** संत मीरा विद्यालयाच्या परिसरात आज स्वच्छता अभियान राबविण्यात आले होते त्यावेळी माजी उपमहापौर प्रमोद राठोड म्हणाले... आज तुम्ही विद्यार्थीदशेत हे ध्येय ठेवा मी सर्वत्रच स्वच्छता ठेवीन.

पुढे ते म्हणाले २०१५ साली संत मीरा विद्यालयाच्या विद्यार्थ्यां पासूनच ओला कचरा.. सुका कचरा वेगळा करून एन -३ एन -४ परिसरा पासून सुरुवात केली होती. त्यानंतर ज्येष्ठ कलावंत सुधीर कोर्टीकर म्हणाले की, मनापाचे स्वच्छता कर्मचारी थोडेच आहेत...पण कचरा करणारे आपल्या सारखें हात हजारों आहेत.आपण प्रत्येकानीच त्यांना सहकार्य केले तरच संपूर्ण परिसरच स्वच्छ सुंदर होईल.. त्यामुळे आपल्या सगळ्यांचेच आरोग्य सुंदर राहिले. संतमीरा शाळेचे एनसीसी कॅडेट , पूर्व प्राथमिक, प्राथमिक, माध्यमिक व उच्च माध्यमिक कर्मचारी, शिक्षक, शिक्षीका, शिक्षकेत्तर कर्मचारी देखील स्वच्छता अभियानात सहभागी होऊन मनापासून उत्साहाने काम करीत होते.

# प्रा. डॉ. प्रकाश खांडगे यांना महाराष्ट्र शाहीर पद्मश्री कृष्णराव साबळे पुरस्कार जाहीर

आधुनिक केसरी न्यूज

**मुंबई :** डोंबिवली येथील प्रसिद्ध सांस्कृतिक संस्था यशराज ग्रुप तर्फे शाहीर कृष्णराव साबळे लोक गौरव पुरस्कार जाहीर झाला असल्याचे या संस्थेचे प्रमुख विवेक ताम्हणकर यांनी जाहीर केले आहे. त्यासोबतच डोंबिवलीतील सामाजिक कार्यकर्ते मधुकर चक्रदेव यांनाही सन्मानित करण्यात येत असल्याचे ताम्हणकर यांनी स्पष्ट केले.



गेली 45 वर्षे महाराष्ट्राच्या लोकसंस्कृतीचा लोकसाहित्याचा लोकसंस्कृतीचा लोककलांचा मूलगामी अभ्यास करणारे मुंबई विद्यापीठाच्या लोककला अकादमीचे माजी विभाग प्रमुख प्रा.डॉ. प्रकाश खांडगे यांना त्यांच्या लोककलेतील योगदानाबद्दल हा पुरस्कार जाहीर करण्यात आला आहे. यापूर्वी तत्कालीन राष्ट्रपती महामहीम रामनाथ कोविंद यांच्या हस्ते डॉक्टर खांडगे यांना संगीत नाटक अकादमी चा पुरस्कार 2019 मध्ये प्राप्त झाला. त्यानंतर 2021 मध्ये भारत सरकारचा पद्मभूषण डॉक्टर कोमल कोठारी पुरस्कार देऊन त्यांनासन्मानित करण्यात आले आहे. त्याशिवाय राज्य शासनाचा सांस्कृतिक पुरस्कार, राज्य वाङ्मय पुरस्कार, शिवनेरी भूषण पुरस्कार विविध पुरस्कारांनी त्यांच्या कार्याचा गौरव करण्यात आला आहे.सदर कार्यक्रम ब्लॉसम इंटरनॅशनल स्कूल सभागृह डोंबिवली पूर्व येथे रविवार दिनांक 8 ऑक्टोबर रोजी सायंकाळी सात वाजता आयोजित करण्यात आला आहे. महाराष्ट्राच्या लोककलेचे मानबिंदू पद्मश्री शाहीर साबळे यांच्या नावे दिला जाणारा पुरस्कार त्यांचे परममित्र लोककलेचे जेष्ठ अभ्यासक डॉ. प्रकाश खांडगे यांना जाहीर झाल्याबद्दल आम्हा सर्व लोककलावंतांना अभिमान आहे. अशी प्रतिक्रिया मुंबई विद्यापीठाच्या लोककला अकादमीचे विभाग प्रमुख डॉ. गणेश चंदनशिवे यांनी व्यक्त केली.

हिवराळे क्लिनिक
ॲण्ड हर्बल हेल्थ केअर
9130174444
डॉ. के.बी. हिवराळे
आयुर्वेद जनरल फिजिशियन,
ॲक्युपंक्चर तज्ज्ञ
B.A.M.S., N.D.,C.M.S.& Ed(MUMBAI)
R.No.2366/12/2000
एमसीए/2022/10/बी/000839 बॉम्बे नर्सिंग होम परवाना क्र.218, औरंगाबाद
उपलब्ध सुविधा
- जुनाट सांधे दुखी (गुडघे दुखी)
- आम वात उदर रोग
- दमा व ॲलर्जी (जुनाट)
- चिकन गुनिया
- मनोकयीईक आजार
- त्वचा व गुप्त रोग
- स्त्रीयांचे आजार
- स्थूलपणा, मूळव्याध
- वंध्यत्व, संतती प्राप्ती
- कॅन्सर सल्ला, मुतखडा
- वजन वाढविणे
- वजन कमी करणे
- केसांच्या सर्व तक्रारी
- लहान मुलांची
- स्मरणशक्ती वाढविणे
पंचकर्म सुविधा (मुख्यकार्य) 1) वमन, 2) विरेचन, 3) बस्ती, 4) नस्य, 5) रक्तमोक्षन

अजिंठा रोड, सारा कॉलनी, फुलंब्री, ता. फुलंब्री, जि. औरंगाबाद

# मुरघासा बनवण्यासाठी हिरव्या मक्याला वाढती मागणी

आधुनिक केसरी न्यूज



**सुलतानपूर :** खुलताबाद तालुक्यातील शेतकरी शेतीला पर्यायी जोडधंदा म्हणून दूध उत्पादनाकडे वळले आहेत आणि विक्रमी दूध संकलन करीत आहे. त्यामुळे वर्षभरासाठी जनावरांना चाऱ्याची कमतरता भासू नये म्हणून ऐन उन्हाळ्या पाठोपाठ आता पावसाळ्यात सुध्दा जनावरांचा चारा साठवण्यासाठी पशुपालक शेतकऱ्यांची लगबग सुरू झाली आहे. त्यामुळे मिळेल तेथून हिरवा मक्क्याचा चारा खरेदी करून त्यांचे रूपांतर मुरघासात करून ठेवण्यासाठी लगबग सुरू झाली आहे. खुलताबाद तालुक्यामध्ये मुरघासासाठी लागणाऱ्या हिरव्या मक्याच्या पिकाला प्रचंड मागणी वाढली आहे. त्यामुळे मका उत्पादक शेतकऱ्यांना ही अगदी तीन ते चार महिन्यांत हिरव्या मक्याच्या चाऱ्यातून चांगले उत्पन्न मिळत आहे. कंपनीच्या मुरघास हा सहा ते सात हजार रुपये प्रति टन मिळतो तर शेतकर्याकडील हिरवी मका दोन हजार रुपये प्रति टन घेऊन कुट्टी करुन पन्नी व पॅंकिंगसाठी लागणारी बँगचा खर्च सहासे रुपये, मकाचा चारा कुट्टी मशीनव्दारे करुन भरुन देण्याचा खर्च नउशे रुपये एक टन मकाची कुट्टी भरल्या जाते, ते पशुपालकांना तिन हजार पाचशे रुपये टनासाठी खर्च येतो. सध्या अनेक शेतकरी हे मक्याचे पीक जनावरांच्या चाऱ्यासाठी घेऊ लागले असून, वर्षातून तीनवेळा या पिकाचे उत्पन्न निघत असून, दर तीन महिन्याला एकरात २५ ते ३० टनांहून अधिक उत्पादन हिरव्या मक्याच्या चाऱ्याचे मिळत आहे.कमी खर्चात एका वर्षात एका लाखाच्या आसपास आर्थिक उत्पन्न मका उत्पादक शेतकऱ्यांना मिळत आहे.

जनावराची भूक वाढते व ते मुरघास जास्त खातात. वाया घालवीत नाहीत. कारण तो रुचकर, स्वादिष्ट व सोम्य रेचक असतो. वाळलेल्या चाऱ्याच्या तुलनेत मुरघासाची पौष्टिकता उत्तम असते. मुरघासाकरिता चारा पिकाची कापणी फुलोरा अवस्थेत केली जात असल्यामुळे जास्तीत जास्त अन्नदव्ये चाऱ्यामध्ये येतात. मुरघास मुळे जनावरांच्या पचनक्रियेत वाढ होऊन दूध उत्पादनात वाढ होते.

# देव्हारी येथे स्वच्छतेच्या संदेशातून गांधींना स्वच्छांजली

आधुनिक केसरी न्यूज

**सोयगाव :**देव्हारी येथे प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांची पूर्तता म्हणून महात्मा गांधी यांच्या जयंतीनिमित्त आयोजित राष्ट्रव्यापी स्वच्छता मोहीम अंतर्गत देव्हारी येथे एकजुटीने एक तास स्वच्छता करून 'बापूंना' स्वच्छांजली अर्पण करण्यात आली. सरपंच तडवी, उपसरपंच मिराबाई चव्हाण यांच्यासह जिल्हा परिषद मराठी शाळेचे मुख्याध्यापक ग्राम विकास अधिकारी सुरेश काळे, जिल्हा सरचिटणीस उत्तम चव्हाण, ग्रामपंचायत सदस्य, पदाधिकारी शिक्षक, पोलिस पाटील, चेअरमन, डॉ.व्ही.पी. राजपूत, अंगणवाडी सेविका, मदतनीस, आशाताई,व्यापारी, शेतकरी व गावातील नागरिकांनी या मोहिमेत सहभागी होवून एक तासाहून अधिक वेळ स्वच्छता करून श्रमदान केले. देव्हारी ग्रामपंचायत कार्यालयचे वतीने या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. ग्रामपंचायतच्या माध्यमातून राबविण्यात आलेल्या स्वच्छता संत सेवालाल महाराज चौक येथे विद्यार्थ्यांनी उत्साहाने सहभाग घेतला आणि स्वच्छतेसाठी सहकार्य केले. महात्मा गांधी यांच्या जयंतीचे औचित्य साधून ही मोहीम आपल्याला कायम ठेवायची आहे असे स्पष्ट करीत निरोगी आयुष्यासाठी स्वच्छता कायम असणं आवश्यक आहे.ग्रामविकास अधिकारी सुरेश काळे यांनी सांगितले म्हणून आपले घर, परिसर व गाव स्वच्छ ठेवण्यासाठी प्रत्येकाने किमान एक तास स्वच्छतासाठी श्रमदान करायची अशी खूणगाठ मनात बांधून कचरामुक्त, स्वच्छ व हरित शहरासाठी संकल्प करावा असे अवाहन जिल्हा सरचिटणीस उत्तम चव्हाण यांनी केले.

# 'सेवा पंधरवडा' अंतर्गत पैठण तालुका भाजपाच्या वतीने स्वछता मोहीम

आधुनिक केसरी न्यूज

**पैठण :** पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या वाढदिवसापासून ते 2 ऑक्टोबरपर्यंत केंद्रीय रेल्वेमंत्री रावसाहेब दानवे यांच्या मार्गदर्शनाखाली स्वच्छता अभियान 2 ऑक्टोबर सोमवार रोजी डॉ. बाबासाहेब आंबेडकर पुतळा परिसरपासून स्वच्छता अभियान करून महाराणा प्रताप पुतळा परीसर ते छत्रपती शिवाजी महाराज पुतळा परिसर स्वच्छता अभियान राबवून सार्वजनिक वाचनालय समोर राष्ट्रपीता महात्मा गांधी जंयती निमीत्त अभिवादन करून जयंती साजरी करण्यात आली. यावेळी डॉ. सुनील शिंदे, विधानसभा प्रमुख, तालुका अध्यक्ष लक्ष्मण औटे, जिल्हा चिटणीस सुरज लोळगे, जिल्हा सरचिटणीस कल्याण गायकवाड, किसान मोर्चाचे जिल्हाध्यक्ष बाप्पा शेळके, स्वच्छता अभियानाचे संयोजक बंडू आंधळे, रेखाताई कुलकर्णी, विजय चाटूपळे, वसंत चोरमल, कल्याण बाबर, महादेव बटुळे, सुरेश गायकवाड, भाऊसाहेब बोरुडे, महेश जोशी, समीर शुक्ल, सुनील वीर, भरत थोटे, सुरज घुले, एकनाथ जाधव, सिद्धार्थ परदेशी, गजानन बोहरा, नम्रता, अश्विनी लखमले,राखी धोकटे, आतिष मापारी, हरीपंडित नवथर,लक्ष्मण पसारे, साईनाथ गिधाने, नितीन गिधाने, विजय आचार्य, गणेश डुकरे शिवाजी तुपे ज्ञानेश्वर दहिवाळ, निलेश स्वामी, कैलास बरकसे आदींची उपस्थिती होती.





# राष्ट्रवादी शिक्षक संघटनेची बैठक

आधुनिक केसरी न्यूज

**धुळे :** जिल्हा राष्ट्रवादी शिक्षक आघाडीची बैठक माजी आमदार तथा राष्ट्रवादी शिक्षक आघाडीचे प्रदेशाध्यक्ष श्री दिलीप सोनवणे यांच्या अध्यक्षखाली संपन्न झाली. माजी आमदार तथा राष्ट्रवादी शिक्षक आघाडीचे प्रदेशाध्यक्ष श्री दिलीप सोनवणे यांनी धुळे जिल्ह्याचा दौरा केला. या दौरा दरम्यान त्यांनी पक्षाच्या देवपूर कार्यालयामध्ये पक्षाची व संघटनेची बैठक घेतली. यावेळेस त्यांनी पक्षाचा कामकाजाचा तसेच शिक्षक संघटनेचा आढावा घेतला. नूतन शिक्षक प्रदेशाध्यक्ष श्री दिलीप सोनवणे यांच्या निवडीबाबत महानगर जिल्हाध्यक्ष रणजीत राजे भोसले व ग्रामीण जिल्हाध्यक्ष जितेंद्र मराठे यांनी सत्कार केला.बैठकीदरम्यान शिक्षक प्रदेशाध्यक्ष म्हटले की, आदरणीय शरद शरदचंद्रजी पवार साहेब हे कायम शिक्षकांच्या पाठीमागे उभे राहिले आहेत. शिक्षकांचे प्रश्न, समस्या सोडवण्यासाठी शिक्षकांनी संघटित होऊन राष्ट्रवादी शिक्षक आघाडीमध्ये सामील व्हावे. लवकरच शहर, ग्रामीण,विभागीय, प्रदेश कार्यकारणी बनवली जाणार आहे. शासकीय कर्मचारी, शिक्षक, शिक्षकेतर कर्मचाऱ्यांसाठी पवार साहेबांनी दिलेलं योगदान अत्यंत मोलाचे आहे. अशा कठीण व संघर्षमय परिस्थितीमध्ये शिक्षकांनी आदरणीय शरदचंद्रजी पवार साहेब यांच्या पाठीमागे उभे राहावे असे आवाहन दिलीप सोनवणे यांनी केले. बैठकीमध्ये कार्यकर्ते, पदाधिकाऱ्यांना रणजीत राजे भोसले, जितेंद्र मराठे, डी. बी. साळुंखे, शकीला बक्ष, जे. बी. सोनवणे सर आदींनी मार्गदर्शन केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक रणजीत राजे भोसले यांनी तर सूत्रसंचालन व आभार प्रदर्शन श्री राहुल महाजन सर यांनी केले. कार्यक्रमाला एडवोकेट एकनाथ भावसार, रईस काझी,उषाताई पाटील, छायाताई सोमवंशी, जयदीप बागल, राजेंद्र सोलंकी, डी. टी. पाटील, डोमेनिक मलबारी, डी.जे. मराठे, वसंत तावडे, डी. पी. पाटील, दादाभाई कापुरे, चेतन पाटील, आकाश बैसाणे, भूषण पाटील, ललित पाटील, संदीप पाटील, राजेंद्र चौधरी, सागर चौगुले, रंजीत शिंदे, सुभाष पाटील, पी.ई. बाविस्कर सर, राजेंद्र भदाणे सर, सुनिल देशमुख, के के बाविस्कर, चेतनाताई मोरे, जयश्रीताई घेटे, राज साळवे, समद शेख,मंगलदास वाघ, राजेश तिवारी, स्वप्निल चौधरी, डॉक्टर शांताराम पाटील, संदीप पाटील, विशाल भाई, वैभव पाटील, भूषण माळी, युनुस शेख, शालिक बोरसे सर, जावेद बेग, राजू चौधरी आदी पदाधिकारी, कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# रिसोड येथे ईद-ए-मिलादुन्नबी उत्साहात

आधुनिक केसरी न्यूज



**रिसोड :** जगाला मानवतेचा संदेश देणारे व दया, क्षमा, संयम, परम आदर, सहनशीलतेचा मार्ग दाखवणारे इस्लाम धर्माचे प्रेषित हज़रत मोहम्मद पैगंबर यांचा जन्मदिवस म्हणून साजरा केला जाणारा ईद-ए-मिलाद मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला.

दरवर्षी ईद-ए-मिलादुन्नबी निमित्ताने रिसोड शहरात मुस्लिम बांधवांच्या वतीने भव्य मिरवणुकीचे आयोजन केले जाते. यावर्षी ईद ए मिलादुन्नबी व गणेश विसर्जन एकाच दिवशी आल्याने मुस्लिम समाजाच्या वतीने आधी गणेश विसर्जन व नंतर ईद मिलादुन्नबीची मिरवणूक असा निर्णय घेतल्याने ३० सप्टेंबर रोजी ही मिरवणूक काढण्यात आली. सकाळी १० वा. शहरातील सर्व मुस्लिम बांधव हे प्रमुख मार्गाने चांदणी चौक, जुनी सराफा लाइन, गुलबावडी, बेंदरवाडी, ब्राह्मण गल्ली, अष्टभुजा देवी चौक, जामा मस्जिद चौक, आसन गल्ली, छत्रपती शिवाजी महाराज चौक, डॉ.बाबासाहेब आंबेडकर चौक या मार्गाने शहरातील परीक्रमा पूर्ण करत धार्मिक गीते, हातात झेंडे व मोहम्मद पैगंबर यांचे कार्याबद्दल माहिती देत रस्त्याने चालत जाऊन येथील पठाणपुरा मस्जीद समोरील मैदानात दुपारी ३ वा. मिरवणुकीचा समारोप झाला. मुस्लिम बांधवांनी आपल्या वरिष्ठ सदस्य व चिमुकल्यांसह आनंदोत्सव साजरा केला. यादरम्यान कायदा व सुव्यवस्था राखण्यासाठी ठाणेदार देवेंद्रसिंह ठाकूर यांचे मार्गदर्शनात पोलिसांचा चोख बंदोबस्त शहरात तैनात करण्यात आला होता. मिरवणूक समारोप झाल्या नंतर रिसोड शहरातील काही भागात भोजन कार्यक्रम आयोजित करण्यात आले होते. यासाठी मुस्लिम समाजातील नागरिकांनी मोठी गर्दी करून भोजनाचा आनंद घेतला. सदर कार्यक्रमानिमित्त सर्वस्तरातून मुस्लिम बांधवावर शुभेच्छांचा वर्षाव होत होता.



# प्रवीण शिंदे यांना मराठवाडा क्रीडारत्न पुरस्कार

आधुनिक केसरी न्यूज

**कन्नड :** तालुक्यातील क्रीडा क्षेत्रामध्ये उत्कृष्ट अशी कामगिरी केल्याबद्दल शिवाजीराव वाकडे पाटील बहुउद्देशीय सेवाभावी संस्था व लाख मराठा प्रतिष्ठान लोहा, जि. नांदेड यांच्यावतीने हा पुरस्कार देण्यात आला.

यावेळी कार्यक्रमाचे अध्यक्ष ऑलम्पिकचे निरीक्षक अशोक दुधारे व लोहा आमदार श्यामसुंदर शिंदे व प्रतिष्ठानचे अध्यक्ष शिवाजीराव वाकडे स्वामी रामानंद तीर्थ विद्यापीठचे क्रीडा विभाग प्रमुख डॉ. मनोज पैंजने आदींच्या प्रमुख उपस्थितीत पार पडला प्रवीण शिंदे व विजय बारवाल यांनी कन्नड तालुक्यातील खेळाडू राष्ट्रीय व राज्य खेळाडू घडवले व तालुक्यातील राज्य स्पर्धा आयोजन केल्याबद्दल हा मराठवाडा क्रीडारत्न पुरस्कार त्यांना देण्यात आला. तालुका क्रीडा संकुल समितीचे अध्यक्ष व आमदार उदयसिंग राजपूत कन्नड तहसीलदार व तालुका क्रीडा संकुल समितीचे कार्याध्यक्ष विद्याचरण कवडकर, गटशिक्षणाधिकारी सुनिता वेरूळकर, केंद्रप्रमुख दिलीप गायकवाड व चिखलठाण प्रशालाचे मुख्याध्यापक हुलराम चिंतलवाड, छत्रपती पुरस्कार विजेते शिवछत्रपती पुरस्कार विजेते व तालुका क्रीडा संकुल समिती सदस्य डॉ. उदय डोंगरे, श्याम खोसरे, मुक्तानंद गोस्वामी डॉ. लक्ष्मण चव्हाण, राकेश निकम अजित खंबाट शेख वसीम, करण राठोड, प्रा. मनोज मोकासे, दिलीप भोसले आदींनी यांचे अभिनंदन केले.

# शिवरायांच्या वाघनखांसाठी लंडनला जातोय हा अभिमानाचा क्षण

## ना. सुधीर मुनगंटीवार : कार्यकर्त्यांचा जल्लोष अन् ढोल ताशांच्या निनादात लंडनकडे रवाना

आधुनिक केसरी न्यूज

**मुंबई :** छत्रपती शिवाजी महाराज यांनी हिंदवी स्वराज्यावर चालून आलेल्या अफजलखानाचा कोथळा वाघनखांनी बाहेर काढला हे आपण लहानपणापासून शिकलो आहोत; ऐकत आलो आहोत. ती वाघनखे ३५० व्या राज्याभिषेक वर्षात शिवप्रेमींच्या दर्शनाला भारतात आणण्याच्या दृष्टीने करार करण्यास लंडन येथे जाताना खूप अभिमान वाटतो आहे, असे भावोद्गार राज्याचे सांस्कृतिक कार्य, वन आणि मत्स्यव्यवसाय मंत्री ना. सुधीर मुनगंटीवार यांनी काढले. लंडन येथे रवाना होण्यापूर्वी मुंबई विमानतळ मार्गावरील छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण केल्यानंतर ना. मुनगंटीवार कार्यकर्त्यांना संबोधित करत होते. आमदार पराग अळवणी, भाजपाचे प्रदेश प्रवक्ते ओमप्रकाश चव्हाण, अमोल जाधव, विनीत गोरे, स्थानिक नगरसेविका यांच्यासह शेकडो कार्यकर्ते यावेळी उपस्थित होते.

ना. मुनगंटीवार छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पुतळ्यासमोर पोहोचताच कार्यकर्त्यांनी जोरदार घोषणा दिल्या, ढोल ताशांचा गजर आणि लेझिम पथकाने परिसर दणाणून सोडला. यावेळी ना. सुधीर मुनगंटीवार यांनी ३५० व्या शिवराज्याभिषेक वर्षानिमित्त मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री श्री. देवेंद्र फडणवीस आणि श्री. अजितदादा पवार यांच्या नेतृत्वात राबविण्यात येणाऱ्या कार्यक्रमांची माहीती देत हे सरकार छत्रपती शिवाजी महाराज यांना अपेक्षित रयतेचे राज्य महाराष्ट्राला देण्याचा संकल्प करुन काम करीत असल्याचे स्पष्ट केले. छत्रपती शिवाजी महाराज हे आमचे दैवत आहे, आमची प्रेरणा आहे त्यांच्या विचारसरणीला धरून केंद्रात श्री. नरेंद्र मोदी आणि राज्यात एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वातील सरकार काम करीत आहे हे स्पष्ट केले. छत्रपती शिवाजी महाराज यांचे वंशज आणि आता त्यांनी वापरलेल्या वाघनखांबाबत शंका उपस्थित करणे दुर्दैवी असून; जेव्हा ब्रिटेनशी प्रत्यक्ष करार करण्याची वेळ आली त्याच वेळी केवळ



जनतेच्या मनांत संभ्रम निर्माण करण्याचा प्रयत्न सुरू आहे अशी खंत त्यांनी व्यक्त केली.

आमदार पराग अळवणी यांनीही मनोगत व्यक्त करुन सुधीर मुनगंटीवार यांना शुभेच्छा दिल्या.

छत्रपती शिवाजी महाराज यांची युद्धकालीन शस्त्र असलेली ही वाघनखे ब्रिटनच्या विक्टोरिया अँड अलबर्ट म्युझियम मधून भारतात परत आणण्याबाबत सामंजस्य करारावर स्वाक्षरी करण्यासाठी सुधीर मुनगंटीवार रवाना झाले आहेत.

छत्रपती शिवाजी महाराज यांच्या राज्याभिषेकाचे ३५० वे वर्ष प्रारंभ होताच ही वाघनखे भारतात परत आणण्याचा संकल्प सांस्कृतिक कार्य मंत्री ना. सुधीर मुनगंटीवार यांनी केला होता. यासाठी महाराष्ट्राचे मुख्यमंत्री ना. श्री. एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री श्री. देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री ना. श्री अजित पवार यांच्या नेतृत्वात केंद्र शासन तसेच आंतराष्ट्रीय पातळीवर ना. सुधीर मुनगंटीवार यांनी सातत्याने पाठपुरावा केला. १५ एप्रिल २०२३ रोजी मुंबई येथे ब्रिटेन चे पश्चिम भारत उप उच्चायुक्त अँलेन गँमेल यांच्यासह ब्रिटन च्या राजकीय व द्विपक्षीय संबंध उपप्रमुख श्रीमती इमोगेन स्टोन यांच्यासोबत बैठक घेवून महाराष्ट्र शासनाने व्हिक्टोरिया अँड अल्बर्ट संग्रहालयाशी पत्रव्यवहार सुरू केला होता.

मंगळवारी 3 ऑक्टोबर रोजी व्हिक्टोरिया अँड अलबर्ट म्युझियम येथे भेट देऊन या संग्रहलायचे संचालक श्री ट्रायस्टम हंट यांच्यासोबत त्यांची बैठक होईल व करारावर स्वक्षऱ्या होतील.

# भोकरला स्वच्छता अभियानास प्रतिसाद

## भाजपा जिल्हा ओबीसी मोर्चाचा उपक्रम

आधुनिक केसरी न्यूज

**भोकर :** अदिम काळापासून स्वच्छतेला अनन्यसाधारण महत्त्व आहे. संतासोबतच राष्ट्रीय महापूरूषानी सूध्दा स्वच्छतेला प्रथम प्राधान्य दिले आहे. त्याचाच वारसा पूढे नेण्यासाठी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी महात्मा गांधी यांच्या जयंतीनिमित्त रविवारी ता. (एक) सर्वत्र स्वच्छता अभियान राबविण्यात यावे असा निर्णय घेतला आहे. शहरात भाजपा जिल्हा ओबीसी मोर्चाचे अध्यक्ष गणपत पीट्टेवाड यांच्या नेतृत्वाखाली अभियान राबविण्यात आले आहे. त्यास उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला आहे.

मागील अनेक वर्षांपासून विविध गंभीर आजाराचे प्रमाण दिवसेंदिवस वाढत आहे. परिणामी आरोग्य विभाग हि बुचकळ्यात पडले आहे. याची सविस्तर माहिती घेतली असता "अस्वच्छता " हेच मुळ कारण असल्याचे स्पष्ट झाले आहे. यातून सूटका करावयाची असेल तर घाणीचे साम्राज्य समूळ नष्ट करणे हा एकच उपाय असल्याचे समजते. अदिम काळापासून संत आणि महापूरूषानी स्वयंस्फूर्तीने स्वताह झाडु हातात घेऊन स्वच्छतेचा संदेश दिला आहे.

तोच वारसा नेटाने पुढे चालू ठेवण्यासाठी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी महात्मा गांधी यांच्या जयंतीनिमित्त निमित्ताने सर्वत्र स्वच्छता अभियान राबविण्यात यावे असा आदेश दिला आहे. हाच मूळ हेतू समोर ठेवून जिल्हा भाजपा ओबीसी मोर्चाच्या वतीने रविवारी शहरातील ग्रामीण रुग्णालयाच्या प्रांगणात पदाधिकाऱ्यांनी स्वच्छता अभियान यशस्वी केले आहे.यावेळी प्रदेश सचिव डॉ .मोहन चव्हाण , जिल्हा अध्यक्ष (उत्तर नांदेड) ओबीसी मोर्चा गणपत पिटेवाड यांच्या नेतत्वाखालील जिल्हा सचिव बाळा आण्णा साखळकर, माधव पाटील,हरिभाऊ चाटलेवार, शिवा जाधव,बालाजी वाघमारे, माऊली पाटील,विलास शिंदे, रमेश मटकमवाड,विजय प्रेमलवाड, प्रवीणभाऊ चव्हाण साई राठोड,राजू देशपांडे, कांदेमोड, बबन सूर्यकर, माधव राठोड, वसंत राठोड, विजय जाधव, बालाजी राठोड, विशाल राठोड, रोहिदास राठोड, साईप्रसाद राठोड, संदीप राठोड, गोविंद जाधव असंख्य कार्यकर्ते पदाधकाऱ्यांनीही श्रमदान केले.





# महात्मा गांधीजी जयंतीनिमित्त स्वच्छता अभियान

आधुनिक केसरी न्यूज

**धुळे :** महात्मा गांधीजी जयंती निमित्ताने माननीय पंतप्रधान नरेंद्र मोदीजी यांनी 15 ऑगस्टच्या दिवशी लाल किल्ल्यावरून आव्हान केले होते. त्या अनुषंगाने स्वच्छता अभियान राबविण्यात आले त्यात माननीय पोलीस अधीक्षक संजय बारकुंड व अप्पर पोलीस अधीक्षक तथा जिल्हा समादेशक अधिकारी होमगार्ड धुळे. किशोर काळे व धुळे पथकाचे समादेशक अधिकारी दिनेश मराठे व त्यांचे सहकारी अधिकारी अजगरअली सय्य, बाळू बैसाणे, मनीष बुवा, शेख लोकमान, किरनचंद्र इसी, अंशकालिन लिपिक सचिन घोडे व संतोष सूर्यवंशी व धुळे पथकाचे एकूण 70 पुरुष व 24 महिला असे सर्व होमगार्ड स्वच्छता अभियान मध्ये सहभागी झाले होते.

# पिंपळनेर येथे आढळला अतिदुर्मिळ साप

आधुनिक केसरी न्यूज

**पिंपळनेर :** परिसरातील मांगी तुंगी डोंगराचा पायथ्याशी असलेल्या मंडाणे गावात सायंकाळचा सुमारास वन्यजीव संरक्षण संस्था पिंपळनेर चां सर्पमित्रांनी अतिदुर्मिळ फॉस्ट्रेन मांजऱ्या जातीचा साप पकडला. हा मांजऱ्या प्रजातीतील निमविषारी साप असून दाट जंगलात आढळून येतो याचे मनुष्यवस्तीकडे आढळण्याचे प्रमाण अगदी क्वचित असून उत्तर महाराष्ट्रात फक्त २ नोंदी आहेत तर धुळे जिल्ह्यात ह्या अतिदुर्मीळ सापाची फक्त एकदा नोंद झाली असून पिंपळनेर चां सर्पमित्रांनी काल ही दुसरी नोंद केली आहे. हा एक निमविषारी साप असून मनुष्यास याचा काहीही धोका नाही असे सर्पमित्रांनी यावेळी सांगितले. हा साप झाडांवर राहून छोटे पक्षी त्यांची अंडी, सरडे व कीटक खात असतो. पिंपळनेर परिसरात असा दुर्मिळ साप सापडणे हे वन्यजीव प्रेमींसाठी आनंदाची बाब आहे, असे वन्यजीव संरक्षण संस्थेचा सदस्यांनी सांगितले. या सापाची वनविभागात नोंद करून सुरक्षित ज्या जंगलाजवळ सापडला आहे त्याच जंगलात सोडण्यात आले. यावेळी वनविभागाचे कर्मचारी वन्यजीव संरक्षण संस्थेचे अध्यक्ष प्रमोद गायकवाड उपाध्यक्ष दानिश पटेल, अमोल बहिरम व आदी सदस्य उपस्थित होते.






# नादयोग कथक केंद्राचे चंद्रपूरच्या सांस्कृतिक क्षेत्रात मोलाचे योगदान

## आमदार किशोर जोरगेवार यांचे मनोगत

आधुनिक केसरी न्यूज

**चंद्रपूर :** हे साहित्य व सांस्कृतिक क्षेत्रात नेहमीच अग्रेसर राहणारे शहर आहे. अनेक सांस्कृतिक कार्यक्रमांच्या माध्यमातून चंद्रपूरातील अनेक नामवंत व्यक्तिमत्त्व राष्ट्रीय पातळीवरही गेलेले आहेत. नादयोग कथ्थक केंद्रानेही चंद्रपूर च्या सांस्कृतिक क्षेत्रात मोलाचे योगदान असुन मृणालिनी खाडिलकर यांच्या संघर्षमय प्रवासातून विद्यार्थिनींनी धडा घेऊन चंद्रपूरचे नाव उज्वल करावे असे मनोगत किशोर जोरगेवार यांनी व्यक्त केले.

नादयोग कथ्थक केंद्राच्या उद्घाटन प्रसंगी जोरगेवार बोलत होते. यावेळी व्यासपीठावर गिनीज बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्ड प्राप्त आचार्य पंडित प्रशांत गायकवाड, डॉ. साल्फळे, प्रा. जयश्री कापसे गावंडे आदि मान्यवर उपस्थित होते. यावेळी पुढे बोलतांना जोरगेवार यांनी नादयोग कथ्थक केंद्राच्या माध्यमातून नृत्य सेवेची सुरु असलेली सेवा ही मनोभावे करा व आपले नाव या क्षेत्रात मोठे करा असे आवाहन केले. पंडीत प्रशांत गायकवाड यांनीही चंद्रपूर मधे सुरु असलेली ही नृत्य साधना आणि त्यासाठी मृणालिनी खाडिलकर या घेत असलेली मेहनत याबद्दल कौतुक करीत त्यांना पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या. कार्यक्रमाच्या औचित्याने आमदार किशोर जोरगेवार यांच्या हस्ते महाकाली मुर्ती व चुनरी देत मृणालिनी खाडिलकर यांचा त्या करीत असलेल्या कार्याबद्दल सत्कार करण्यात आला.



# गांधींना जयंतीनिमित्त श्रमदानातून श्रद्धांजली

आधुनिक केसरी न्यूज

**खुलताबाद :** तालुक्यातील बोडखा अर्पण करण्याकरिता भारत सरकार व महाराष्ट्र शासनाच्या आदेशानुसार आज दि.01/10/2023 वेळः10.00 ते 11.00 या कालावधीत बोडखा गावात 'स्वच्छता ही सेवा!' या स्वच्छता मोहीमेर्तंगत श्रमदान करण्यात आले. यावेळी गावातील सर्व पदाधिकारी, ग्रामसेवक, सरपंच, पोलीस पाटील, ग्रामपंचायत सदस्य, ग्रामपंचायत कर्मचारी, संगणक ऑपरेटर, शासकीय आरोग्य केंद्राचे डॉक्टर, आरोग्य सेवक, आशा सेविका, अंगणवाडी सेविका, सह. सोसायटीचे चेअरमन, सेक्रेटरी, शिपाई, जि.प.शाळेचे सर्व शिक्षकवृंद, कैलास माध्य. व उच्च माध्य. विद्यालयाचे सर्व शिक्षकवृंद, गावातील जेष्ठ नागरिक, नवतरुण, महिला व बालकांनी सहभाग घेतला. गावचौक, गावातील रस्ते, ग्रामपंचायत परिसर, जि.प. शाळेचे प्रांगण, मारुती मंदिराचा परिसर स्वच्छ करण्यात आले. गावकऱ्यांनी मोठ्या संख्येने श्रमदान करण्यात सहभाग नोंदवला. माहितीस्तव, रायभान यादवराव सोनवणे पाटील.



# लोह्यातील शासकीय रुग्णालयात फळ वाटप

आधुनिक केसरी न्यूज

**लोहा :** देशातील नामांकित व अग्रेसर असलेली पतसंस्था म्हणजे बुलढाणा अर्बन को आप क्रेडिट सोसायटी. बुलढाणा अर्बन चे संस्थापक अध्यक्ष राधेश्यामजी चांडक उर्फ भाईजी यांच्या वाढदिवसानिमित्त लोहा उपजिल्हा रुग्णालयात रुग्णांना फळ वाटप करण्यात आले.

वेगवेगळे सामाजिक उपक्रम राबविण्यात नेहमीच पुढाकार घेणारी सोसायटी म्हणून बुलढाणा अर्बन को ऑप.क्रेडीट सोसायटी ही प्रथम क्रमांकावर राहिलेली आहे.देशभरात नावारूपाला येवून लाखो ग्राहकांचा विश्वास संपादन करून जनमानसात वेगळी छाप निर्माण करणारी संस्था म्हणून वेगळा लौकिक मिळवलेला आहे. अशा नामांकित सोसायटीचे संस्थापक अध्यक्ष राधेश्यामजी चांडक उर्फ भाईजी यांच्या वाढदिवसानिमित्त दि.(०२) आक्टोबर रोजी प्रतिवर्षीप्रमाणे याही वर्षी लोहा येथील उपजिल्हा



रुग्णालयातील रुग्णांना लोहा शाखेच्या वतीने फळ वाटप करून अतिशय स्तुत्य उपक्रम राबविला. प्रसंगी उपजिल्हा रुग्णालयाचे डॉ.विनायक कुलदीपक,डॉ. लोहारे, सिस्टर चाटे मैडम,वाघमारे,केंद्रे मामा,सोहेल,ज्येष्ठ पत्रकार सुरेश जोंधळे, आदी मान्यवरांच्या हस्ते रुग्णांना सेफ, बिस्किट, वाटप करण्यात आले.

यावेळी बुलढाणा अर्बन लोहा चे शाखा व्यवस्थापक रमेश गव्हाणे,सह शाखा व्यवस्थापक राजीव जैन, लिपिक कदम प्रवीण, ऋषिकेश खरात, ओमप्रकाश सोनवळे, शिपाई अंकुश गीते, मल्लिकार्जुन पाटील, सचिन महाजन, बालाजी निरमलवार, किशोर गुडमेवार, सोनार ढगे श्रीकांत यांच्या सह सर्व स्टाफची उपस्थिती होती.

# वडोद बाजार येथे 'मेरी माटी मेरा देश' या योजने अंतर्गत श्रमदान स्वच्छता अभियान

आधुनिक केसरी न्यूज

**वडोद बाजार :** येथे ग्रामपंचायत अंतर्गत मेरी माती मेरा देश या उपक्रमांतर्गत स्वच्छता अभियान कळस पूजन व की मिरवणूक वृक्ष वाटप व जनावर गोठा विहीर विविध योजनेच्या कार्यारंभE आदेश वाटपाचा कार्यक्रम रविवारी सकाळी नऊ वाजता संपन्न झाला फुलंब्री तालुक्यातील वडोद बाजार येथील ग्रुप ग्रामपंचायत अंतर्गत वडोद बाजार येथे विविध कार्यक्रमाचे आयोजन करून स्वच्छता अभियान राबविण्यात आले एक तास श्रमदान करून स्वच्छता अभियान राबविण्यात आले व मेरी माटी मेरा देश या उपक्रमांतर्गत कळस मिरवणूक वृक्ष वाटप व ग्रामपंचायत अंतर्गत असलेल्या जनावर गोठा विहीर या योजनेच्या कार्यारंभ आदेशाचे वाटप करण्यात आले या कार्यक्रमाच्या साठी वडोद बाजार पोलीस ठाण्याचे उपनिरीक्षक संभाजी खाडे, माजी सभापती सर्जेराव मेटे वडोद बाजार ग्रामपंचायतचे सरपंच पाकीजा पठाण ,उपसरपंच गोपाळ वाघ, चेअरमन कडूबा म्हस्के, ग्रामविकास अधिकारी नारायण पाथरे, ग्रामपंचायत सदस्य शिवराम म्हस्के, सुहास वायकोस शेख राजीक, पांडुरंग मंदाडे, काकाजी कोलते, शिलाबई शिनगारे, आसाराम कोलते अशोक शिंनगरे, सोमनाथ कोलते, अरूण वयकोस, शेख सलमान, नासेर पठाण, गोविंद पांडेजी अजिनाथ वाघ, अंजुम शेख, मिर्झा बेग, ताजमात शहा, वडोद बाजार येथील पशुसंवर्धन विभागाचे डॉक्टर वडोद बाजार येथील प्राथमिक आरोग्य केंद्राचे डॉक्टर कर्मचारी, सरस्वती भुवन प्रशालेतील शालेय विद्यार्थी व शिक्षक जिल्हा परिषद शाळेतील विद्यार्थी व शिक्षक, तलाठी गावंडे, अंगणवाडी सेविका, तसेच गावातील नागरिक ग्रामस्थ ग्रामपंचायत कर्मचारी यावेळी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

वडोद बाजार येथे मेरी माती मेरा देश या योजने अंतर्गत श्रमदान स्वच्छता अभियान व विवीध कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.



# नॅशनल हायवे लगत झोपडीवर चालून आले आयशर; पाच ठार सात जखमी

आधुनिक केसरी न्यूज

**बुलढाणा :** नांदुरा तालुक्यातील वडनेर भोलजी गावाजवळ नॅशनल हायवे सहाच्या रोडलगत झोपडीत राहणाऱ्या मजुरांवर झोपेत असतांना माल वाहतूक आयशर गाडीने चिरडल्याची घटना २ ऑक्टोबर रोजी सकाळी पाचच्या दरम्यान घडली. सध्या नॅशनल हायवेचे काम सुरू असून हे सर्व मजूर त्या कामावर होते. सदर घटणा वडनेर भोलजी गावाजवळ नॅशनल हायवे वर उड्डाणपुलाजवळ घडली.अपघातामध्ये मृतक प्रकाश मकु धांडेकर वय 26 वर्ष, पंकज तुळशीराम जांभेकर 19 वर्ष,राजाराम दादू जांभेकर वय 35 वर्ष,अभिषेक रमेश जांभेकर १८वर्ष राहणार मोरगड तालुका चिखलदरा जिल्हा अमरावती येथील असून यात ५मजूर मरण पावले आहेत तर जखमींमध्ये दीपक पणजी बेलसरे, कमल रमेश जांबेकर, वर बजे, शाम भास्कर, सर्व राहणार मोरगड भुया भुयार



भुया राहणार बोरी मतोली तहसील गढवा, अक्षय कुमार श्री कुमार भैय्या राहणार चिनीया, सतपाल कुमार मलिकचंद राहणार बोरी मातोली यांचा समावेश आहे.जखमीवर मलकापूर सामान्य रुग्णालयात उपचार सुरू आहेत.

# भारतीय जनता पक्षाच्या वतीने सेवा पंधरवडानिमित्त भव्य रक्तदान शिबिर

आधुनिक केसरी न्यूज

**खुलताबाद :** तालुक्यात भद्रा मारुती मंदीर परिसरात भारताचे यशस्वी पंतप्रधान आदरणीय नरेंद्रजी मोदी साहेब यांच्या जन्मदिनानिमित्त 17सप्टेंबर ते 2 ऑक्टोंबर 2023 हा सेवा पंधरवाडा म्हणून साजरा करण्यात येत आहे. सेवा पंधरवाडा निमित्ताने अनेक सेवा उपक्रम राबविण्यात येत आहेत. सेवा पंधरवाडा याचाच एक भाग म्हणून आज खुलताबाद तालुक्यात भद्रा मारुती मंदिर परिसरात भव्य रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. या रक्तदान शिबिरात लायन्स क्लब रक्त पेढीच्या वतीने 102 रक्तदात्याचे रक्त संकलन करून घेण्यात आले. अनेक युवकांनी व कार्यकर्ते मित्रांनी मोठ्या संख्येने रक्तदान केले.

या रक्तदान शिबिराला आमदार प्रशांत भाऊ बंब, भारतीय जनता पक्षाचे जिल्हाध्यक्ष संजय भाऊ खंबायते, जिल्हा सरचिटणीस अनिल भैया चोरडीया, यांनी भेट दिली. यावेळी जिल्हा उपाध्यक्ष श्री प्रकाश वाकळे, तालुकाध्यक्ष श्री ज्ञानेश्वर नलावडे, विधानसभा निवडणुक प्रमुख विकास कापसे, युवा मोर्चा जिल्हाध्यक्ष अमोल जाधव, गंगापूर तालुका अध्यक्ष रविंद्र चव्हाण, कृष्णा सुकासे, रामेश्वर मालुसरे, शहराध्यक्ष सतीश दांडेकर, उपनगराध्यक्ष सुरेश मरकड, युवा मोर्चा जिल्हा उपाध्यक्ष संदीप निकम, दिनेश अंभोरे, नगरसेवक योगेश बारगळ, परसराम बारगळ, आशिष कुलकर्णी शिवाजी गायकवाड, रमेश नागे, अविनाश कुलकर्णी, प्रभाकर शिंदे, सतीश आहेवाड, अंकुश काळे, रावसाहेब देशमुख, विजय जाधव, बंडू शिंदे, सोमनाथ तुरेवाले, अंकुश गायकवाड, संतोष गायकवाड, बाळू नलावडे, किरण बोडखे, सुरेश जाधव, अजिनाथ जाधव, यांची प्रमुख उपस्थिती होती.






उमरीतील मोंढा परिसर हा बाजार पेठसाठी प्रसिद्ध आहे. येथे बाहेरून लोक खरेदीसाठी येतात. बाजारपेठेतील रस्त्यांवरच घाण पाणी वाहत असल्याने नागरिकांना याचा प्रचंड त्रास सहन करावा लागत आहे. या गोष्टींकडे नगर पालिकेचे कायम दुर्लक्ष असते. बाजार पेठेतील ही बिकट परिस्थिती पाहून रस्त्यावर फिरण्यास जागा नाही. सर्वत्र नालीचे पाणी वाहत असल्याने डेंग्यू होण्याची भीतीही नाकारता येत नाही. एकीकडे संपूर्ण देशात स्वच्छता मोहिम राबवली जात असताना उमरीत मात्र घाणीचे साम्राज्य पसरले आहे. छायाचित्र : साईनाथ हमंद

# चंद्रपूर जिल्ह्यात सुगंधी तंबाखू तस्करी जोरात


आधुनिक केसरी न्यूज

**चंद्रपूर :** जिल्ह्यात सुगंधी तंबाखू व दारूची मोठ्या प्रमाणात तस्करी सुरू आहे. अवैध सुगंधी तंबाखु तस्करी करतांना ९ लाखाचा माल जप्त करण्यात आला आहे. तर पांढ्या गोणीत ३० दारूच्या बॉटल जप्त करण्यात आल्या.बल्लारपूर येथे एक कोटींचा सुगंधीत तंबाखू पकडल्याचे प्रकरण ताजे असतांनाच दुर्गापूर येथे ९ लाखाचा अवैध सुगंधी तंबाखू पकडला आहे. चंद्रपुर जिल्ह्यात वाहतूक पोलिसांनी ९ लाख रूपयांचा अवैध सुंगधित तंबाखु जप्त केला आहे. या कारवाईमध्ये दोघांना अटक केली आहे. दुर्गापूरकडून चंद्रपुरात येणाऱ्या एका वाहनामध्ये नाका बंदी चौकशी दरम्यान सापडला. यावेळी सहाय्यक पोलिस निरीक्षक सुधीर जाधव, संदीप जाधव यांनी कारवाई केली. बल्लारपूर रेल्वे पोलिसांनी दारूच्या ३० बॉटल पकडल्या आहेत. काझीपेठ जिल्हा हनवाकोंडा तेलंगणा येथील कपाट येथे आरपीएफ व जीआरपी यांनी संयुक्त झडती घेतली असता३० दारूच्या बाटल्या आढळून आल्याने जीआरपी बल्लारशाह यांनी आरोपीला ताब्यात घेऊन कारवाई केली.

# 33 वर्षांपासून दरोड्यातील फरार आरोपीस पकडण्यात वडोदबाजार पोलिसांना यश

आधुनिक केसरी न्यूज

**फुलंब्री :** तालुक्यातील वडोदबाजार



पोलीसांना 33 वर्षापासुन दरोडयातील फरार आरोपी जेल बंद करण्यात यश आले आहे. 1990 साली वडोदबाजार पोलीस ठाणे येथ गुरन 80/1990 कलम 395 भादंवि प्रमाणे दाखल झाला होता त्याबाबत मा न्यायालयात सदर गुन्हयाचे दोषारोप पत्र दाखल झाले व मा न्यायालयाने आरोपीला फरार घोषीत केले होते. 33 वर्षांपासून दरोडयातील फरार आरोपीचे नाव गॅस बापु भोसले, असे आहे सदर आरोपी आपली ओळख लपवून वावरत होता सदर आरोपीस नाव का बदलले असे विचारले असता त्याने उत्तर दिले की मला लोक गॅस सिलेंडर असे चिडवायचे म्हणुन मी माझे नाव दिपक असे ठेवले होते. सदर आरोपीस दोन वडील असल्याने 01. बापु भोसले (02. दगडु शिंदे असे असल्याने त्याने त्याचे नाव गॅस बापु भोसले उर्फ दिपक दगडु शिंदे असे ठेवले व ओळख बदलून विविध ठिकाणी राहावयास गेला होता. सदर आरोपीची सर्व माहीती गुप्त बातमीदार मार्फत काढुन सदर आरोपीस सापळा रचुन पकडण्यात वडोदबाजार पोलीसांना यश आले आहे सदर आरोपीस मा न्यायालयासमोर हजर केले असता मा न्यायालयाने त्यास न्यायालयीन कोठडी सुनावली आहे. सदर ची कारवाई ग्रामिण पोलीस अधिक्षक मा मनिष कलवानिया , पोलीस अप्पर अधीक्षक छत्रपती संभाजीनगर ग्रा. सुनिल लांजेवार, जयदत्त भवर उप विभागिय पोलीस अधिकारी छ. संभाजीनगर ग्रा. यांचे मार्गदर्शनाखाली वडोदबाजार पोलीस ठाण्याचे सपोनि विलास मोरे, पोलीस उपनिरीक्षक संभाजी खाडे, सह सहाय्यक फौजदार चव्हाण, सफै जिवरग, सफै मालोदे , पोहेकॉ मोरे , पोहेकॉ गोरे आदीनी हा कार्यवाही यशस्वी केली.

# पोलीस स्टेशन लोहा येथे स्वच्छता पंधरवडा

आधुनिक केसरी न्यूज

**लोहा :** पोलीस स्टेशन लोहा व संत गाडगे महाराज शाळा त्यांच्या वतीने आज रोजी पोलीस स्टेशन लोहा येथे स्वच्छता मोहीम घेण्यात आली.

सदर मोहिमेमध्ये शाळेची सर्व विद्यार्थ्यांनी विद्यार्थ्यांनी यांनी भाग घेतला, तसेच शाळेतील शिक्षक आणि मुख्याध्यापक यांनीही सहभाग घेतला तर पोलीस स्टेशनचे अधिकारी कर्मचारी यांनी ही सहभाग घेऊन स्वच्छता मोहीम राबवली. पोलीस अधिकारी ओमकांत चिंचोलकर साहेब, श्री संत गाडगे महाराज शाळेचे मुख्याध्यापक दिलीप बोतगिरे सर, उप मुख्याध्यापक श्री बी. डी. जाधव सर यांच्यासह पोलीस कर्मचारी व शाळेतील विद्यार्थी विद्यार्थिनी उपस्थित होते.

यावेळी पोनि चिंचोलकर यांनी स्वच्छतेबाबत विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. स्वच्छता म्हणजे काय तसेच स्वच्छता ही आत्मिक, बौद्धिक, वैचारिक आणि परिसरातील अशी असावी. आपले विचार आपली वाणी ही स्वच्छ असावी, आपले राहणे वागणे हे पण स्वच्छ असावे, त्यानंतर आपला परिसर स्वच्छ असावा अशाप्रकारे स्वच्छतेचे महत्व आणि स्वच्छता म्हणजे काय हे विस्तृत पणे पोनि चिंचोलकर यांनी विद्यार्थ्यांना समजून सांगितले.

यावेळी पोलीस स्टेशन तर्फे संत गाडगे महाराज शाळेचे विद्यार्थि व स्टाफचे स्वच्छता मोहिमेत सहभाग घेतल्याबद्दल पोलीस स्टेशन लोहा तर्फे आभार मानन्यात आले.



# गणोरी आरोग्य केंद्र येथे स्वच्छ भारत अभियान

आधुनिक केसरी न्यूज

**फुलंब्री :** तालुक्यातील गणोरी येथे राष्ट्रपिता महात्मा



गांधीह्यांच्या जयंतीच्या अनुषंगाने माननीय पंतप्रधान नरेंद्र मोदी ह्यानी संपूर्ण भारतीयाना स्वच्छ भारत अभियानात सहभागी होण्याचे आवाहन केले. यात गणोरी येथे श्री सांडू अण्णा जाधव तालुका अध्यक्ष भाजपा ह्यांच्या नेतृत्वात गणोरी येथील प्राथमिक आरोग्य केंद्रात स्वछता अभियान राबविण्यात आले. यावेळी इलियास शहा ( जिल्हा अध्यक्ष अल्पसंख्याक ) डॉ. सतीष साबळे ( आरोग्य अधिकारी ) बाळासाहेब तांदळे ( अध्यक्ष भाजपा युवा मोर्चा) बाबासाहेब तांदळे (तालुका अध्यक्ष राष्ट्रवादी) कैलास सोनवणे, रामभाऊ उबाले, दिलीप भादवे (ग्रामपंचायत सदस्य गणोरी), अक्षय न्यायाधिश (संचालक ज्ञानेश्वरी गुरुकुल) योगेश तांदळे, दिनेश जाधव, भाऊसाहेब चंद्रे, लहू भादवे, सद्दाम शेख, शांताराम शिंदे, सोमीनाथ तांदळे, वैजिनाथ उबाळे, राधू पेहरकर, ग्रामपंचायत सदस्य गावकरी व आरोग्य कर्मचारी उपस्थित होते.

गुप्तरोगाबाबत
काहीही लपवू नका



(रविवारी मोफत तपासणी)



डॉ. शेख ए.एच.

या अशा अडचणी असतात ज्या कोणाला सांगता येत नाहीत व न सांगितल्याने त्या वाढत जातात पण काळजी करू नका डॉक्टरपासून काहीही लपवू नये, ते आपले सर्व प्रश्न सहज सोडवितात. डॉ. शेख आजपर्यंत 200 पेक्षा अधिक पुरस्काराने सन्मानित, प्रचंड अनुभवी व अत्यंत माफक खर्चात इलाज करतात, आजपर्यंत लाखों पेशंटनी याचा अनुभव घेतलाय, आपली माहिति अत्यंत गुप्त ठेवली जाते, आयुर्वेदाने सर्व रोग नष्ट होतात, (रविवारी मोफत तपासणी).
आपल्या सर्व चिंताचा एकमेव उपाय म्हणजे डॉ. शेख यांचे नवजीवन आयुर्वेदीक डीस्पेंसरी. आजच भेट द्या व खात्री करा.

नवजीवन आयुर्वेदिक डिस्पेन्सरी

सेंट्रल बसस्टँड समोर, हॉटेल मिर्झा जवळ, औरंगाबाद.
फोन : (0240) 2350042, मो. : 9021111549 www.drshaikhah.in

शहरातील विश्वसनीय बिग सुपर मार्केट

महावीर
घर संसार



किराणा | सुका मेवा | मसाले | क्रॉकरी
प्लास्टिकच्या वस्तू | स्टीलच्या वस्तू | ॲल्युमिनियमच्या वस्तू
घरगुती उपकरणे | साफ सफाईचे सर्व साहित्य | आणि बरेच काही

सुमित 7620111118 राजेश जैन 7588348738
रमेश जैन (क्रॉकरी) 9860481142 7620111117
व्हॉट्सअपवर ऑर्डरसाठी 9850017181
वितरण स्थितीसाठी 9021395308
घाऊक चौकशीसाठी 7620111118

www.mahavirbestprice.com
sumitparakh73@gmail.com

S.P. रोड, चेलीपुरा, शहागंज, छत्रपती संभाजीनगर
प्लॉट क्रमांक A25, MIDC पोलिस स्टेशन समोर, चिकलठाणा, छत्रपती संभाजीनगर